छात्र प्रबोधन

सौर श्रावण, शके १९३६ । वर्ष १४ अंक ११
वार्षिक वर्गणी ₹ १८०

ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी, कृतिशीलता जोपासणारे मासिक !

ज्ञान प्रबोधिनीचे आद्य संचालक

कै. वाचस्पती विनायक विश्वनाथ तथा आप्पा पेंडसे

जन्म : १७ ऑगस्ट १९१६

मृत्यू : १९ आगस्ट १९८३

वरदविनायक हे संचालक

वरदविनायक, हे संचालक, युवजन नायक नमो
हे संचालक नमो ।। ध्रु. ।।

तुम्ही अम्हाला इथे शिकविले इतरांसाठी जिणे
घोर जरी अंधार भोवती तरुणांनी का भिणे ?
उज्ज्वल माझा दिवस उद्याचा सर्वांसाठी असो
एक एक जोडीत जीवना जनसंघटना दिसो
स्वप्न असे हे तुम्हि दिधलेले प्रतिदिन आम्हा गमो ।। १ ।।

मत्सर आहे, मस्ती आहे, पुंडजनांची भीती
दारिद्र्याचा शाप सनातन, दांभिकता ही नीती
शब्द-वेष-देशांच्या भिंती, लढत शेकडो जाती
धमन्यांमधुनी र त एक परि पूर्ण लोपली नाती
अशा आपुल्या हतबल देशा सुधारण्या मन रमो ।। २ ।।

बुद्धिमंत हो पूर्ण समर्पित, विद्या हो व्रतदायी
लाचारीचा अंश नसावा समाजसेवेपायी
धर्म बनावा समाजधारक विद्वत्ता उपयोगी
निराधार खेड्यात सुखाची स्वप्ने व्हावी जागी
असे प्रबोधन हे आजीवन तुजसम आम्हा जमो ।। ३ ।।

छात्र प्रबोधन

सौर श्रावण, शके १९३६। वर्ष १४ अंक ११

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४ (जुलै - ऑगस्ट १९९२) २६५ वा अंक, वर्ष २३ अंक १

प्रकाशन दिनांक – सौर १० श्रावण, शके १९३६/१ ऑगस्ट २०१४

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

• अंतरंग •

४.	**संवाद**	- महेन्द्र सेठिया
५.	कथा ... **सत्कार...**	- सुहासिनी देशपांडे
१०.	कविता... **गुराखी**	- सूर्यकांत मालुसरे
११.	अनुभवपर.. **प्रवास एका चित्रनिर्मितीचा...**	- चंद्रमोहन कुलकर्णी
१५.	प्रेरणादायी... **संग्रामाची पूर्वसंध्या!**	- अरविंद भावे
१७.	ललित... **गोविंदाऽऽ रे गोपाळाऽऽ**	- महेश केळुसकर
२०.	स्फुटं... **महान गणितज्ञ 'भास्कराचार्य'-१** (कूटप्रश्न)	- किरण बर्वे
२१.	प्रासंगिक... **केंद्रीय अर्थसंकल्प २०१४-१५**	- प्रफुल्ल कुलकर्णी
२४.	कविता... **एकरूप**	- एकनाथ आव्हाड
२५.	ललित... **साठा उत्तराची 'कहाणी'**	- डॉ. रामचंद्र देखणे
२९.	संवाद कौशल्य...१३ **संवादात देहबोलीचे महत्त्व - २**	- स्वप्नीला सेठिया
३२.	**दिवाळी अंक प्रकाशनपूर्व नोंदणी केंद्रप्रमुख संपर्कसूची**	
	मुखपृष्ठाच्या आतील पानावरील पद्य... **वरदविनायक हे संचालक**	- रामभाऊ डिंबळे

याशिवाय – पु. ल. उवाच (२०), थोडीशी गंमत (१४, २४), गणपतीची आकर्षक सजावट (३१), प्रतिसादी वाचकवीर व्हा -४ (३४)

या अंकातील पानाखालील ओळी निसर्गपर आहेत.

तळटिपेतील ओळी – भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतिकारकांच्या आहेत.

♦ संपादक, प्रकाशक, मुद्रक ♦
महेन्द्र सेठिया

♦ कार्यकारी संपादक ♦
शिल्पा कुलकर्णी

♦ संपादक मंडळ ♦
शैलजा देशमुख,
नीलिमा करमरकर
डॉ. कांचनगंगा गंधे,
आश्लेषा महाजन

♦ मुखपृष्ठ ♦
चंद्रमोहन कुलकर्णी

♦ आतील चित्रे ♦
अंजली पुरंदरे

♦ संपर्क पत्ता ♦
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे – 411030
☎ (०२०) २४२०७ १७४/१७९
संकेतस्थळ
www.chhatraprabodhan.org
ई-मेल
chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

मासिकाची वर्गणी
वार्षिक: ₹ १८०, द्वैवार्षिक: ₹ ३४०,
त्रैवार्षिक: ₹ ५००,
दशवार्षिक: ₹ १,५००.
(पुण्याबाहेरील धनादेशासाठी- ₹ २० जादा,
घरपोच दिवाळी अंकासाठी
प्रतिवर्षी ₹ ४० जादा)
या अंकाची किंमत : ₹ १५

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही र कम प्राप्त झाली आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतील असे नाही.

छात्र प्रबोधन : निव्वळ मासिक नव्हे !... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ !!

स्मरण क्रांतिवीरांचे : ब्रिजबासी लाल – उत्तर प्रदेश – भारत छोडो आंदोलनात सहभाग.

संवाद

प्रिय हिंमतवान प्रबोधकांनो,

महिनाभर दडी मारलेल्या पावसाने नुकतीच हजेरी लावून सर्वांच्याच जीवात जीव आणला. मागच्या महिन्यात डोंगरदऱ्यात भटकायला गेलो होतो; त्यावेळी शेतकऱ्यांशी गप्पा मारताना हे विशेषत्वाने पुन्हा एकदा जाणवले. जमलं तर, या महिन्यात जवळपासच्या शेतांवर, तेथील शेतकऱ्यांबरोबर काही तास ते दोन-तीन दिवस काम करायला अवश्य जाऊन या. तुम्हाला निश्चितच वेगळा अनुभव मिळेल. शेतकऱ्यांच्या कष्टाची सह-अनुभूती घेतल्याशिवाय अन्नाचं आणि अन्न आपल्यापर्यंत पोहोचवण्याऱ्या बळीराजाचं महत्त्व आपल्याला कळणार नाही. शेतात काम करता करता तुम्ही शेतकऱ्यांशी गप्पा मारा. त्यांची सुख-दुःख समजून घ्या. त्यांच्या अडचणी-प्रश्न जाणून घ्या. हे करण्यासाठी वेळप्रसंगी शाळेला दांडी मारावी लागली, तरी हरकत नाही. गरज पडली तर हट्ट करा, आई-वडील-शिक्षक यांना पटवून द्या आणि २-४ मित्रांचा गट करून, जाऊन या गावाकडे! इतका हा अनुभव महत्त्वाचा आहे. असे चाकोरीबाहेरचे अनुभव घ्यायला हिंमत लागते, बरं का!

सध्या पुष्कळवेळा माझी भांडणे होतात... रस्त्यावरच्या चौकातल्या 'सिग्नल'ला थांबण्यावरून! नाही कळलं का...? माझ्या घरून प्रबोधिनीत येताना सुमारे १० ते १२ 'सिग्नल' लागतात. लाल दिवा लागला की मी थांबतो. थोडावेळ (काही सेकंद) सगळे थांबतात. मग सुरू होतात माझ्या मागे असलेल्या वाहनांचे 'हॉर्न'! लाल दिवा, हिरवा होण्याच्या आतच चौक पार करण्याची त्यांची जी काही धडपड चालू असते; त्याला मी दाद दिली नाही, की मग 'बाचाबाची' सुरू होते. नंतर माझ्या डावीकडून-उजवीकडून, जागा काढून अन् माझ्याकडे तुच्छतेनं बघून लाल दिवा असतानाच मोठा 'विजय' मिळवल्याच्या थाटात, ते चौक पार करतात. त्यांना वाटतं ते किती हिंमतवान! तुम्हाला काय वाटतं? नियम पाळणं, शिस्त पाळणं, स्वच्छता राखणं याला जास्त हिंमत लागते की नियम मोडायला, बेशिस्त वर्तन करायला, अस्वच्छतेत भर घालायला जास्त हिंमत लागते?

श्रावण/भाद्रपद (ऑगस्ट/सप्टेंबर) महिने अनेक सण-समारंभ-विशेष दिवसांनी भरगच्च असतात. शाळेमध्ये अन् आपल्या सोसायटी-आळीत अन् आपल्या घरांमध्येही अनेक छोटे - मोठे कार्यक्रम चालू असतात. बहुतांश कार्यक्रम वर्षानुवर्षे एकाच पद्धतीनं साजरे केले जातात. मग ते कार्यक्रम का होतात? त्यातून काय साध्य होतं? हे हळूहळू समजेनासं होतं. ते कार्यक्रम निरर्थक वाटायला लागतात. मग त्यात अर्थाचा अनर्थ करणारे कार्यक्रम घुसतात. मग काहीजण या अनर्थक गोष्टी अन् त्यातीलअचकट-विचकटपणा करण्यातच आनंद मानतात. आपण अधिक हिंमतवान असे त्यांना वाटते. पण खरंतर अशा अनर्थ करणाऱ्या गोष्टींविरुद्ध आवाज उठवण्याला जास्त हिंमत लागते. आणि अशा निरर्थक गोष्टींना अधिक अर्थपूर्ण, कल्पक पर्याय द्यायला त्यापेक्षाही अधिक हिंमत लागते. यावर्षी तुमच्या शाळेतील १५ ऑगस्ट, गणेशोत्सव कार्यक्रमांना काय-काय कल्पक, अर्थपूर्ण पर्याय तुम्ही देऊ शकाल? कोणत्या निराळ्या पद्धतीने हे कार्यक्रम तुम्ही साजरे करू शकाल? जरा विचार करून पाहा. आणि नुसत्या कल्पना सुचून भागत नाही. त्या कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी तर अजून जास्त हिंमत लागते.

अशी हिंमत ज्यांनी-ज्यांनी दाखवली, ते मोठे झाले! ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक-संचालक आदरणीय **कै. आप्पा पेंडसे** हे त्यातीलच एक! समाजातल्या विकृत, कालबाह्य गोष्टींवर टीका करण्यात त्यांनी धन्यता मानली नाही, तर त्याला तितकाच जोशपूर्ण पर्याय त्यांनी उभा करून दाखवला. गणेशोत्सवात आपण करत असलेले 'बरची नृत्य' हे त्याचेच एक रूप! त्यांचा स्मृतिदिन ऑगस्टमधलाच! त्यानिमित्ताने, त्यांच्याच एका मानसपुत्राने त्यांच्या निर्वाणानंतर लिहिलेले एक गीत मुखपृष्ठाच्या आतील पानावर दिले आहे. त्याचा अर्थ समजून घ्या. तो अर्थ प्रत्यक्षात आणण्यासाठी लागणारी हिंमत तुम्ही सर्वांनी मिळवावी, यासाठी मनापासून शुभेच्छा! अशा हिंमतवान प्रबोधकांशी दोस्ती करायला मला अधिक आवडेल.

तुमचा दादा,

(महेन्द्र सेठिया)

जरी निरव, नि:स्तब्ध, दिसे पहुडला काठ। हळु, हळु हिंदोळते, पाणी खोल खोल आत !।।

स्मरण क्रांतिवीरांचे : मंगल पांडे - उत्तर प्रदेश - इ.स.१८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यात सहभाग.

प्रायोजक - डॉ. कीर्ती आपटे, पुणे - दात मजबूत राखण्यासाठी दातांची नियमित निगा राखा.

प्रत्येकाच्या मनात समाजातील गैर प्रवृत्तींबद्दल राग असतो. काही चांगलं करण्याची सुप्त इच्छाही असते. फक्त या ऊर्मीला कृतीची जोड दिली जात नाही. या कथेत आपल्या मित्र–मैत्रिणींसह असंच एक विधायक काम करणारी वैदेही तुम्हाला भेटेल. तिची गोष्ट वाचून तुम्हालाही असंच छान काम करण्याची प्रेरणा नक्कीच मिळेल.

सत्कार

– सुहासिनी देशपांडे

वैदेहीला जेव्हा ते पत्र मिळाले तेव्हा आश्चर्याने तिच्या तोंडाचा जो 'आँ' झाला, तो कितीतरी वेळ बंदच झाला नाही.

काय होतं त्या पत्रात?

बाबा म्हणाले, ''अहो, चंबूराव, बंद करा तो चंबू तोंडाचा, नाहीतर कोणीतरी जाऊन बसेल तोंडात!''

त्यावर सगळे हसले, तेव्हा वैदेही थोडी सावध झाली.

आई म्हणाली, ''वैद्या, मोठा तीर मारलात तुम्ही. सत्कार आहे तुमचा, 'जागर' नावाच्या मोठ्या सामाजिक संस्थेद्वारा.''

'पण आपण न की काय केलं? कुणाचा बुडताना जीव वाचवला, की कुणा दहशतवाद्याला पकडून दिलं, की मुंबईतल्या महापुरात पूरग्रस्तांसाठी मदतकार्य केलं? कोणता मोठा तीर मारला, आई म्हणते तसा?' वैदेहीच्या मनात आलं.

वैदेहीला जाणवलं नाही, तरी फार मोठं पर्यावरणविषयक जागृतीचं काम तिनं केलं होतं. त्याचं असं झालं–

अरे हो! पण ते सांगण्यासाठी वैदेहीला झालेल्या चमत्कारिक अपघाताविषयी सांगितलं पाहिजे.

त्या दिवशी वैदेहीच्या आईचा एका कंपनीत इंटरव्ह्यू होता. वैदेहीचीसुद्धा त्याच दिवशी त्याचवेळी चित्रकलेची स्पर्धा होती. ती स्पर्धा घरापासून दूर कॅम्पातील एका शाळेत होती आणि आईच्या इंटरव्ह्यूच्या मार्गावरच ते ठिकाण होतं. नेहमीप्रमाणे आई म्हणाली, ''चल पटकन माझ्या वेळेला आटोप. मी तुला सोडते आणि मग जाईन इंटरव्ह्यूला.'' वैदेहीनं शहाण्यासारखी तयारी केली आणि निघाली आईबरोबर. जाताना मागून दुचाकीवरून आलेल्या दोघा तरुणांपैकी एकानं गुटख्याची मोठी गुळणी रस्त्यावर थुंकायला आणि वैदेहीच्या आईची स्कूटर त्याठिकाणी येण्याला एकच गाठ पडली. आणि.. पुढचं सारं रामायण घडलं. आईच्या कपड्यावर घाणेरडे डाग पडले. शिवाय त्या अनपेक्षित प्रकारापासून स्वत:ला वाचवण्याच्या नादात मागे बसलेल्या वैदेहीला मागून येणाऱ्या वाहनाची धडक बसली नि ती रस्त्यावर फेकली गेली. मागून येणारी बस काही अंतरावर कचकन थांबली म्हणून मोठा अनर्थ टळला तरी वैदेहीचा पाय महिनाभर प्लॅस्टरमध्ये ठेवावा लागला. नशीब एवढेच, की उन्हाळ्याच्या सुट्टीचे दिवस होते.

थोडे सैलावून मन, बंध मोकळे करून। वाटे विहरत जावे, हिरव्या रानावनातून !।।

स्मरण क्रांतिवीरांचे : ठाकूर दरावसिंग – उत्तरप्रदेश – इ. स.१८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यात सहभागी.

प्रायोजक - सौ. प्राची व श्री. शंतनू पटवर्धन, ह्यूस्टन, टे सस, अमेरिका.

हे सगळं इत या निमिषार्धात घडलं; पण त्याचे परिणाम फार दीर्घकाळ आणि फार खोलवर झाले. वैदेही प्लॅस्टरमध्ये अडकवलेला पाय घेऊन घराच्या कैदेत अडकली. विरंगुळा म्हणून ती घराच्या बाल्कनीत बसू लागली. बाल्कनीत बसल्या बसल्या आसपासचा परिसर न्याहाळताना तिला लोकांच्या घाणेरड्या सवयी डोळ्यांत खुपू लागल्या. सायकलवरून जाता जाता थुंकणारे वीर, झाडून साफ केलेल्या आणि नुकत्याच काँक्रिटीकरण केलेल्या रस्त्यांवर आपल्या लाड या कुत्र्यांना विधीसाठी घेऊन फिरवणारे त्यांचे तथाकथित सुशिक्षित मालक, कोपऱ्यावरच्या रिक्षा थांब्यापाठी गुटख्याच्या पुड्या तोंडात सोडून प्लॅस्टिकचा कचरा रस्त्यात तसाच टाकून थुंकीचा सडा शिंपणारे रिक्षावाले, कचऱ्याची गाडी दाराशी येत असूनही घरातला कचरा स्वत: गाडीत टाकण्याऐवजी कामवाल्यांना टाकायला लावणाऱ्या (आळशी?) गृहिणी. तो कचरा पलीकडच्याच रिकाम्या असलेल्या आणि तारेचं कंपाउंड असलेल्या प्लॉटमध्ये फेकून देणाऱ्या चतुर कामवाल्या. आपल्या दुकानामधला कचरा रस्त्यावर लोटणारी दुकानातील व्यवहारचतुर पोरं, सकाळी वर्तमानपत्राचं वाटप करण्यासाठी कोपऱ्यावरच तात्पुरता स्टॉल उभारून पेपर्सचे गठ्ठे सोडल्यानंतर त्या वेष्टनांचा प्लॅस्टिकचा कचरा रस्त्यावरच फेकून देणारे तरुण विक्रेते, भाज्यांचा कचरा रस्त्यावर टाकणारे भाजीवाले... अशा अनेक गोष्टी वैदेहीला जाणवू लागल्या. वैदेहीला पाहता पाहता वाटायचे, 'माणूस हा सामाजिक प्राणी आहे', 'माणूस हा विचार करणारा प्राणी आहे', 'माणूस बुद्धिमान प्राणी आहे' वगैरे सगळ्या व्याख्या बदलून 'माणूस हा घाण करणारा प्राणी आहे' अशी नवी व्याख्या करायला पाहिजे. भारतीय लोक प्रगत वस्तू वापरण्यात पुढे आहेत. मात्र, स्वच्छतेच्या बाबतीत अगदीच मागासलेले आहेत. वैदेहीला असा विचार करता करता खूप वाईट वाटत राही. कारण तिचे तिच्या देशावर खरेच खूप प्रेम होते. तिला तिच्या देशाचा खूप खूप अभिमान होता. रोज शाळेत प्रतिज्ञा म्हणताना एखादी ईश्वरी प्रार्थना म्हणावी तित या तन्मयतेने ती 'भारत माझा देश आहे'ही प्रतिज्ञा म्हणत असे. तिच्या मनात येई, 'असे कसे आपले बांधव? कसे सुधारायचे यांना?' १५ ऑगस्ट नि २६ जानेवारीला उंच आकाशाच्या पार्श्वभूमीवर लहरणारा तिरंगा पाहून राष्ट्रगीत म्हणताना तिचा ऊर अभिमानाने भरून यायचा. असे असताना आपल्या शहरातल्या जागोजागी ओसंडून वाहणाऱ्या कचराकुंड्या बघून तिला चीड यायला लागली. 'कोणी बघत कसे नाही? कुणालाच शहराची ही दुरवस्था, अस्वच्छता खुपत कशी नाही? काय करावे?' वैदेहीचा चिमुकला जीव घरात बसल्याबसल्या या प्रश्नांनी उबून जाऊ लागला. दुपारी तिचे मित्र–मैत्रिणी खेळायला जमायचे; पण वैदेहीचा काही खेळायचा 'मूड' नसायचा.

''काय झालं गं?'' मैत्रिणीनं तिला काळजीनं विचारलं.

''तसं विशेष काही नाही गं! पण मी खूप अस्वस्थ आहे. तुम्हाला तर माहीत आहे मला अपघात कशामुळे झाला ते! हल्ली इथं रोज *बाल्कनीत* बसून गेले काही दिवस मी निरीक्षण करतेय आपल्या परिसराचे... आणि आसपासचा कचरा पाहून मी खूप अस्वस्थ होते. मला सध्या चांगलं काही दिसतच नाहीये. सकाळी पक्षी किलबिल करीत नाहीत. सगळा निसर्ग आपल्याला सोडून चाललाय असंच वाटतं मला.''

''हे बघ, वैदे, नुसतं सुस्कारून नि भावनाविवश होऊन चालणार नाही. काहीतरी उपाय शोधायला हवा,'' मैत्रिणी म्हणाल्या.

''ए, आपण काहीतरी करायला हवं.''सुचित्रा म्हणाली.

केशरी लाल पिवळी फुले, वसंताशी बोले। पवनाचे नाते, रंगल्या सृष्टीशी जुळे॥

स्मरण क्रांतिवीरांचे : अशफाकुल्ला खान – उत्तरप्रदेश – काकोरी कटात सहभाग.

प्रायोजक - डॉ. गीतांजली व डॉ. सिद्धार्थ पटवर्धन, ग्लासगो, स्कॉटलंड (U.K.)

मग सायली म्हणाली, ''नुसतीच लोकांवर टीका करून, नाक मुरडून काहीच होणार नाही. आपल्या समोरच्या इमारतीत राहाणारे ते आजोबा मोठे व्यंगचित्रकार आहेत. दर दिवाळीला हे आजोबा अगदी गर्दीच्या ठिकाणी, भर चौकात उभे राहून स्वत:च्या खर्चानं आणि मेहनतीनं तयार केलेली दिवाळीची भेटकार्ड येणाऱ्या-जाणाऱ्यांना देत असतात आणि त्यातील चित्र आणि कविता यातून पर्यावरणाचा संदेश देतात.''

''काय सांगतेस काय, सायली?''

''हो, सायली सांगते ते बरोबर आहे.'' वैदेही म्हणाली.

''हे आजोबा परवा मला भेटायला आले होते. मला अपघात झाल्याचं त्यांना असंच कुठूनसं कळलं. हे बघा, त्यांनी मला दिलेले एक भेटकार्ड. दर दिवाळीत आजोबा अशी भेटकार्डे तयार करून लोकांना वाटत असतात. काय होतं त्या भेटकार्डात? त्यांनी हात जोडून विनंती केली होती. *'रहदारीचे नियम पाळा. लाल दिव्याचा संकेत तोडू नका. सुरक्षित राहा आणि दुसऱ्यांच्या सुरक्षेची काळजी घ्या.'* त्यावरूनच मला एक कल्पना सुचली.

वैदेही म्हणाली, ''आपणपण असेच काहीतरी अभियान करूया का?''

वैदेही पुढे म्हणाली, ''मला असं वाटतं, आपण आपल्या या साऱ्या कॉलनीसाठीही 'स्वच्छता जागरण मोहीम' आखूया.''

''आपण येवढेसे लहान ! मोठ्यांना शहाणपण शिकवायला गेलो तर मोठे ऐकतील असं वाटतं का तुला?'' ऋजुतानं शंका विचारली.

''का नाही ऐकणार? आपण जर चांगल्या पद्धतीनं विनम्रपणे मोठ्यांना आवाहन केलं, तर ते न कीच ऐकतील. न कीच सहकार्य करतील,'' वैदेही म्हणाली.

मग पुन्हा जोरदार चर्चा झाली. प्रत्येकानं हिरिरीनं आपल्या कल्पना मांडल्या. मग असं ठरलं, की सर्वांनी मिळून कॉलनीतील नागरिकांना आवाहन करणारं पत्रक तयार करायचं. पत्रकाचा मसुदा तयार करण्याचं काम वैदही, सायली नि ऋजुताकडे देण्यात आलं. अशी 'मसुदा समिती' तयार झाली. जास्तीत जास्त स्वयंसेवक गोळा करण्याचं काम वेदांतकडे देण्यात आलं; कारण वेदांतला माणूस जोडण्याची, मित्र बनविण्याची चांगलीच हातोटी होती. त्याला 'जनसंपर्क प्रमुख' म्हणून नेमण्यात आलं. पियूषला मोठ्या माणसांचं साहाय्य मिळविण्याच्या कामगिरीवर नियु त करण्यात आलं. मुलांच्या डो यातून एक-एक कल्पना बाहेर पडू लागल्या. मुलं कामाला लागली. काही दिवसांतच वैदेहीनं छानसा मसुदा तयार केला.

प्रिय रहिवासी सुजन हो, आपण भारतीय, जगातील प्रथम क्रमांकाची शक्ती बनण्याची इच्छा बाळगत आहोत. मात्र, एकीकडे भौतिक सुधारणा, सुविधा आणि सुबत्ता अनुभवत असतानाच असे लक्षात येते की मूलभूत स्वच्छता, स्वच्छतेच्या सवयी, सार्वजनिक स्वच्छतेविषयीची आस्था याबाबत आपण भारतीय फार कमी पडतो आहोत. देशभरात कोठेही जा; रस्त्यावर कचरा फेकणे, निसर्गरम्य ठिकाणी प्लॅस्टिकचा कचरा टाकणे, रस्त्यावर थुंकणे,

झाले जांभळे डोंगर, रेषा दिसती धूसर। इथे तिथे सळसळे, हिरवाईची लहर।।

स्मरण क्रांतिवीरांचे : प्रेमकृष्ण खन्ना - उत्तरप्रदेश - काकोरी कटात सहभाग.

प्रायोजक - सौ. मंजुषा सावर्डेकर, पुणे.

इमारतींमधून कोपऱ्यात गुटखा, तंबाखूच्या पिचकाऱ्या टाकणे...

आमच्या शाळा व महाविद्यालयांमधील स्वच्छतागृहांची झालेली दुरवस्था यापेक्षा काही वेगळी नाही. याविषयी आणखी बोलण्यासारखे खूप आहे. पण ते बोलण्यात काही फारसा फायदा नाही. कारण आपण सर्वजण सुजाण सुशिक्षित नागरिक आहोत. याबाबत खूप काही करण्यासारखे आहे, हे आपण सारेच जाणतो. म्हणूनच हे अभियान आम्ही आपल्या कॉलनीपुरते चालविले आहे. असे म्हणतात, की या जगात फक्त एका व्यक्तीस सुधारण्याची आवश्यकता आहे. ती सुधारली तर सारे जग सुधारेल आणि ती व्यक्ती म्हणजे आपण स्वत:! तेव्हा आपण आपल्या पासूनच या परिवर्तनाची सुरुवात करूया.

काय करायचे आहे आपणास? –

- *आपला कचरा म.न.पा.च्या गाडीतच टाकण्याचा आग्रह धरावा.*
- *आपल्याकडील पाळीव कुत्र्याचा विधी रस्त्यावर उरकू नये. कुत्र्यास फिरावयास नेताना कुत्र्याची घाण उचलण्यासाठी प्लॅस्टिकची पिशवी व अन्य साधनसामग्री मालकाने बरोबर बाळगावी. अन्य कोणी कुत्र्यास रस्त्यावर घाण करून देताना पाहिले तर त्यांना हटकावे. घाण उचलण्यास समजावून सांगावे.*
- *वसाहतीतील पान-तंबाखूच्या ठेल्यांवर गुटखा विकला जाणार नाही याची नागरिकांनीच खबरदारी घ्यावी. ठेल्यांच्या आसपासचा परिसर पान-तंबाखूच्या पिचकाऱ्यांनी गलिच्छ होणार नाही यासाठी ठेलेवाल्यांवर नागरिकांनीच दबाब आणावा.*
- *थुंकणाऱ्यांना स्वत:स आपण काही घाणेरडेपणाने वागत आहोत, जे समाजाला आवडत नाहीये; याची जाणीव नसते. सुजाण नागरिकांनी त्या थुंकणाऱ्या लोकांना हटकावे व या चुकीच्या कृत्याबद्दलची जाणीव त्यांना करून द्यावी.*
- *याचप्रकारे वसाहतीत भाजी-फळे वा अन्य विक्रीसाठी हातगाड्या लावणाऱ्या विक्रेत्यांसही कचरा न करण्याविषयी समज द्यावी.*

अशाप्रकारे बरेच काही लिहून पत्रके तयार करण्यात आली. मुले कुठल्यातरी चांगल्या मोहिमेवर आहेत, हे मोठ्यांच्या लक्षात यायला वेळ नाही लागला. मग मोठ्यांनीही त्यामध्ये आपले सहकार्य देऊ केले.

कार्टूनिस्ट आजोबांपर्यंत ही बातमी गेली तशी तेही वैदेहीला भेटण्यासाठी आले. त्यांनी मुलांची बैठक घेतली आणि 'हा जनजागरणाचा उपक्रम पूर्ण सप्ताहभर एखादया चळवळीसारखा, आंदोलनासारखा राबवावा' असे सुचविले. आणि स्वत: सुंदर नि बोलकी व्यंगचित्रे काढून मोठे मोठे कापडी फ्ले स तयार करून दिले.

''आता सर्वांनी तयार राहायचं. वसाहतीतील इमारती प्रत्येकानं वाटून घ्यायच्या, प्रत्येक इमारतीतील प्रत्येक घरात जाऊन त्यांनी पत्रक दयायचं आणि शिवाय तोंडी प्रत्येकाला विनम्रतापूर्वक यात सहभागी व्हायला सांगायचं. कोणी दार लावतील. कोणी उलटे-सुलटे प्रश्न विचारतील. आपण आपली नम्रता आणि मनाची शांती सोडायची नाही,'' वैदेहीने सर्वांना नीट समजावून सांगितलं.

मुलांचा उत्साह तर विचारायलाच नको. कधी न पाहिलेल्या इमारतींमध्ये ते जात होते. कधी न भेटलेल्या व्य तींशी छान बोलत होते. त्यांना उत्तम प्रतिसाद मिळत होता.

''वैदेऽ, लोक जाम खूष आहेत. आम्हाला वाटलं होतं, की आपल्याला वेड्यात काढतील. हुसकावून लावतील. 'मोठे आले शहाणपण शिकवणारे!' असं काही तरी हिणवून नाउमेद करतील; पण तसं काहीच नाही,'' पियूष म्हणाला. आणि मग सर्वांनीच आपापले अनुभव सांगितले. ते उत्साहवर्धक होते.

''असं पाहा, स्वच्छता, शिस्त कोणाला नको आहे? पण कोणीतरी पुढाकार घ्यायला पाहिजे. तो आपण घेतला,'' वैदेही समाधानानं म्हणाली.

मग साऱ्या वसाहतीत एकच वातावरण. मुलांनी शाळेच्या

वनरंगाची मैफल गं, वनगंधाची फिरकी गं। पक्षी सुरात गाती गं, नभ निळे ते हासे गं॥

स्मरण क्रांतिवीरांचे : महाराजा कुमारसिंह – बिहार – इ. स. १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यात सहभागी.

प्रायोजक - श्री. सुधीर विष्णू दफ्तरदार, पुणे.

रिक्षावाल्या काकांना, आपल्या दोस्तांना या अभियानात सामील करून घेतले. मुलांनी रि शावर लावायला पाटी तयार करून घेतली. ‘मी या शहराचा रिक्षावाला आहे. मी रहदारीचे नियम पाळतो. मी रस्त्यात थुंकत नाही. मी पान-तंबाखू-गुटखा खात नाही. मी या शहराची शान आहे.’

कार्टूनिस्ट आजोबांनी रिक्षावाल्यांसाठी थांब्या-थांब्यावर लावण्यासाठी सुंदर बोलकी व्यंगचित्रं काढून फ्ले स तयार करून दिले.

वैदेहीच्या बालचमूची तुकडी आता वसाहतीतील दुकानदारांकडे वळली. दुकानातून कोणी रस्त्यावर कचरा टाकू नये यासाठी त्यांना दुकानाबाहेर मोठे मोठे कचऱ्याचे प्लॅस्टिकचे डबे ठेवावेत, असे सुचविण्यात आले. कचरा टाकताना त्यांनी मोठ्या प्लॅस्टिकच्या थैल्या डब्यात ठेऊन त्यात कचरा टाकावा; म्हणजे डब्यावर माशा बसणार नाहीत किंवा अन्य जंतूंची पैदास होणार नाही, असं सुचवलं. त्यामुळे बेकरीवाले, मिठाईवाले, भेळ-पुरीवाले नि अन्य छोट्या-छोट्या खाद्यपदार्थांची विक्री करणारे दुकानदार हे सगळेच स्वच्छतेबाबत अधिक सतर्क झाले.

त्या भागातील तरुण, उत्साही नि विधायक कामाची आच असलेल्या नगरसेवकांपर्यंत ही बातमी अर्थातच पोहोचली. त्यांनी वसाहतीतील कार्यकर्त्यांची बैठक घेऊन आपल्या साऱ्या वॉर्डसाठीच ही स्वच्छता मोहीम अधिक कल्पकतेनं वापरण्याचं ठरवलं आणि त्वरेनं तशी ठोस पावलंही उचलली.

कार्टूनिस्ट आजोबांमुळे आता वृत्तपत्रांपर्यंत ती बातमी पोहोचली. त्यांनी स्वत:च त्यावर सुंदर लेख लिहिला. वार्ताहरांबरोबरच वृत्तवाहिन्याही आपापले कॅमेरे सरसावत पुढे आल्या. शहरभरच त्याची चर्चा आणि केवळ चर्चाच नाही तर त्याची अंमलबजावणीही सुरू झाली. महापौरांनीही याची दखल घेताना म्हटले - ‘‘खरोखर सार्वजनिक स्वच्छतेचे बाळकडू आम्ही शाळांतूनच द्यायला हवे. दंडात्मक कारवाई, शिक्षा यातून समाज सुधारणार नाही, तर सामाजिक दडपणानेच सुधारेल. हे या छोट्या मुलांनी आमच्या लक्षात आणून दिलं. त्याबद्दल त्यांचं कौतुक केलं पाहिजे.’’

झाले. लाट आली तशी ती ओसरलीही. मात्र, शहराला स्वच्छतेचा मंत्र कायमची देऊन गेली. वैदेहीचं प्लॅस्टर निघालं. शाळा सुरू झाल्या. सर्वजण नव्या धावपळीत. ‘जागर’ या समाजसेवी संस्थेनं मात्र वैदेही आणि तिच्या मित्रमंडळींचं कर्तृत्व नोंदवून ठेवलं. यथावकाश त्यांनी वैदेहीचा आणि तिच्या मित्र-मैत्रिणींचा गौरव करण्याचं ठरविलं. आज त्यांच्याचकडून आलेलं पत्र पाहून वैदेही अचंबित झाली होती.

आता तुम्हाला प्रश्न पडला असेल, कोणते हे शहर ज्याला स्वच्छतेचा असा दिव्य मंत्र मिळाला? आणि कोण ही वैदेही जिचा या ‘जागर’ संघटनेनं सत्कार केला? आणि कसलं हे तिचं अफलातून मित्रमंडळ? भेटायला हवं एकदा!

तर मित्रांनो, तुमचंच शहर, तुमचंच गाव ते! आणि वैदेही? ती तर तुमच्या-आमच्या मनात सतत जागी असते. बघा तुम्हालासुद्धा असं काहीतरी अद्‌भुत करावंसं वाटतं की नाही? मग ‘वैदेही’ ही म्हणजे तुमच्याच मनातील ऊर्मी आहे काहीतरी करण्याची !! आणि तुम्हाला करावंसं वाटलं की साथ देणारे हजारो हात तयार होतात; कारण प्रत्येकालाच उत्तमतेची, काहीतरी चांगलं करण्याची ओढ असते. कृश नि सामान्य दिसणाऱ्या आण्णा हजारेंच्या जे मनात होतं, तेच करोडो लोकांच्या मनात होतं; म्हणून अण्णांच्या मागे लोक उभे राहिले. ‘वैदेही’ अवस्थेत अशा अनेक उत्तम कल्पना आपल्या मनात असतात. त्या साकार होतात; त्या अशा झपाटलेल्या व्य तींमधून! म्हणूनच ही वैदेहीची कथा. तुमच्या माझ्या मनातली वैदेही. आणि हो, तिचा सत्कार करणारेही आपणच!

***

- **सुहासिनी देशपांडे**
३ पुण्यश्री अपार्टमेंटस्, रस्ता क्र. ७,
डहाणुकर कॉलनी,
कोथरुड, पुणे 411038

अणुरेणुतून प्रस्फुट होती , चैतन्याचे उन्मेष। सर्वाभूती व्यापून आहे, तूच एक परमेश।।

स्मरण क्रांतिवीरांचे : वैकुंठ शु ल - बिहार - सविनय कायदेभंग चळवळीत सहभाग.

प्रायोजक - श्री. नचिकेत खरे, पुणे.

गुराखी



एक गुराखी नदीच्या काठी
डोई घोंगडी हातात काठी ।।
बसला शांत झाडाखालती
चरती गुरे माळावरती ।।१ ।।

गार वाऱ्याची झुळूक रानी
झाडांचे पंखे हालती वनी ।।
भोवती रान हिरवेगार
वाजवी पावा मंजूळ स्वर ।।२।।

नदीचे पाणी चालले गात
वेडीवाकडी वळणे घेत ।।
दिवसभर फिरे रानात
झाडाफुलांशी चाले बोलत ।।३ ।।

पाचूची बेटे, मोरांचे थवे
गर्द झाडीत गाती पारवे ।।
हिरवा चारा लागला मुखी
गाई वासरे रानात सुखी ।।४ ।।

चालला रवी मावळतीला
अंधार थोडा दाटुनी आला ।।
घुंगूरमाळा वाजती गळा
देव बुडाला मावळतीला ।।५ ।।

घराची ओढ लागे रानाला
झाडावरती पाखरे गोळा ।।
घेवुनी पाठी काठी, घोंगडी
निघाला घरी गुराखी गडी ।।६।।

– सूर्यकांत मालुसरे
श्री दर्शन, के. जी. मार्ग, प्रभादेवी, मुंबई 400025

बंधन अदृश्य सीमेचे, मी उल्लंघून जाईन। मी ठरविन क्षितिज माझे, मी सीमंतिनी होईन !

स्मरण क्रांतिवीरांचे : कृष्णा सिंग – बिहार – असहकार चळवळीत सहभाग.

प्रायोजक – श्री. संदीप जगधने, पुणे.

प्रवास एका चित्रनिर्मितीचा...

सूर्यास्ताच्या समयीचा सागरकिनारा... पाण्यात दूरवर दिसणाऱ्या होड्या... किनाऱ्यावरील माणसांच्या गर्दीतून अलगद एकटा पडलेला एक नावाडी... आपली नाव पाण्यात लोटण्याच्या योग्य क्षणाची वाट पाहाणारा... होडीच्या लाटा यांच्याशी तादात्म्य पावलेला... अशासारखी दृश्य आपल्यासारखी सामान्य माणसंही डोळ्यांनी अनुभवतात. पण एखाद्या प्रतिभावंत चित्रकाराच्या नजरेला असं दृश्य पडलं तर पंचेंद्रियांनी अनुभव घेत असतानाच त्या दृश्याचं चित्र त्याच्या अंत:चक्षुंपुढे साकारतं. त्या दृश्यातील रंग, गतिमानता, तेथील व्यक्तींची भावावस्था, निसर्गातील जिवंतपणा सारं–सारं त्याच्या सर्जनशील मनाला भावतं आणि कागदावरील चित्रात उतरतं.

चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णींचं मुखपृष्ठावरील चित्र खऱ्या अर्थाने जाणून घेण्यासाठी वाचूया त्या चित्राच्या निर्मितीप्रक्रियेचा त्यांनी स्वत:चं शब्दात पकडलेला काव्यमय अनुभव – 'ओघळ'!

ओघळ

– चंद्रमोहन कुलकर्णी

खरं तर इथं हर्ण्यावर इतकी माणसं आहेत, की कुणाला एकटं वाटण्याचं कारण नाही.
कुणी एकटं असण्याचंही फारसं कारण नाही.

पण हा इकडे एकटा आहे.
गर्दीचा एखादा तुकडा कटआउट करून गर्दीतच जरासा बाजूला चिकटवल्यासारखा.
ह्याचं एकट्याचं जणू हे विश्व.
कितीतरी वेळ हा इथे गर्दीत होता.
कोरसमध्ये ह्याचासुद्धा एक आवाज मिसळलेला होता.

मी ह्या अर्ध्या हिरव्या चड्डीवाल्याला बराच वेळ पाहतोय.

खूप वेळ हा इथेच गर्दीत होता.
तीनचार मित्रांबरोबर.
त्यांनी त्यांची होडी जेव्हा पाण्यात, आत ढकलली,
तेव्हा हा त्यांच्यातच होता.
त्यांच्यापैकीच एक.
त्यांच्याबरोबर आत पाण्यात गेला.
बाहेर आला तेव्हा पांगापांग झाली.
हा ओघळत ओघळत कडेला आला.
वॉटरकलरमधल्या एखाद्या ओघळासारखा.
एकटा झाला.

रंगीबेरंगी फुलांना हाकारत कोण आलं?। रिकाम्या झुल्यावर कोण अलगद झुललं ?।।

स्मरण क्रांतिवीरांचे : योगेंद्र शु ल – बिहार – भारत छोडो आंदोलनात सहभाग.

प्रायोजक - सौ. गीतांजली हेमंत जोशी, वाशी, नवी मुंबई.

हा एकटा झाला तेव्हा पाण्यातल्या सावल्याही गडद होत आलेल्या.

हा एकटा झाला, तेव्हा यानं बिडी काढली.
शांतपणानं दोनचार झुरके मारून अचानकच त्याच्या होडीकडे जाऊ लागला.
०
बराच काळ आपण एखादी गोष्ट करायची ठरवलेली असते.
ही गोष्ट कधी करायची, हेही ठरलेलं असतं.
त्या गोष्टीची वेळ कधी येणार हेही आपल्याला सरावानं, अंदाजानं माहीत असतं.
ही गोष्ट आपण नेहमीनेहमी करत असलो, तर त्यातले तपशीलही आपल्याला माहीत असतात.
कधीकधी तर ती गोष्ट किंवा ते काम आपल्या नकळत बेफिकिरीनं आपण करून टाकलेलंही असतं.
०
ह्याची गोष्ट जरा निराळी दिसते.
हा हे काम जवळजवळ रोजच करत असणार.
आपण ते करणार हे त्याला आधीच माहीतही असणार.
पण त्याच्या कामात बेफिकिरी दिसत नाही.
रोजरोज तेचतेच काम केल्याचा कंटाळाही दिसत नाहीये.
संध्याकाळ होत आल्यानं पाण्याच्या वरच्या थरावर सूर्यास्ताच्या खुणा लपक-लपक करतायत.
पाण्याच्या जराशा कालच्या थरावर प्रतिबिंबाची गडद, दाट गर्दी उसळलेली.
पर्शियन ब्ल्यूमधे करड्या रंगाची मिसळण हालचाल करत असलेली.
प्रतिबिंब ओघळाओघळांनी चित्रात येणार, हे जणू मला आत्ताच दिसतंय.
कुठेकुठे ठळक दाट पांढरा येणार, हेसुद्धा दिसतंय की काय मला आत्ताच?

ते बघू चित्राचं नंतर.
०
आता हा मघाच्या गर्दीतून एकटा बाजूला झालेला,
इतका वेळ शांत प्रवृत्तीचा वाटणारा मनुष्य
एकाएकी वेगवान होऊन लवलव करू लागलाय.
झट यात बिडी टाकून देऊन झपकन् होडीकडे वळलाय.

पुन्हा थांबला.

का थांबला हा अचानक?
कसली तरी वाट बघतोय.
कसली वाट बघतोय हा?

मला ह्या माणसात आता प्रचंड इंटरेस्ट निर्माण झालाय.

लाटा पुढे पुढे येत होत्या.



हिरव्या हिरवाळीचे पाते, सांगे धरणीशी नाते। चाफा मोगऱ्याची फुले, सांगे सुगंधाशी नाते ।।

स्मरण क्रांतिवीरांचे : गोपीनाथ बरडोलाई - आसाम - असहकार चळवळीत सहभाग.

प्रायोजक - श्री. क्षेत्रपालेश्वर टुरिस्ट, पुणे, ☎ ०२०- २४४५०९७५

समुद्रावरच्या प्रज्ञामग्न अवस्थेत कधीकधी आपल्याला संभ्रम होतो ना, लाटा पुढे येतायत का आपण पुढे चाललोय?
लाटांच्या वेगानं,
वाऱ्यानं
थोडीशी झिंगही आल्यासारखं वाटतंय.
(दुपारच्या एकाच किंगफिशरचा इतका परिणाम नसेलच हा न की !)
०
ह्याला बोट पाण्यात ढकलायचीय.
हा वाट बघतोय,
त्याला हवी तशी लाट येण्याची.
लाट आली.

त्या ला ह वी त शी ला ट आ ली.

एकदम पातळ. हलकी.
चलाखीनं त्यानं लाटेच्या उंचवट्यावरून नेम धरून होडी पुढे सरकवली.
चांगलीच पुढे सरकली की होडी !
त्याला हवा तो क्षण एकदाचा त्यानं ताब्यात घेतला होता.
खरं तर त्यानं तो नेमका हेरला होता,
निवडला होता !

याचं हे रोजचंच काम असणार.
पण आत्ता हे काम तो खेळ खेळत असल्यासारखं करतोय.
नव्हे, हा खेळतोच आहे.

होडी.

लाट.

होडी.

लाट.

होडी.
लाट.
होडी.
लाट.
होडी होडी. लाट लाट. होडीलाट होडीलाट.

हे मला आवडलेलं आहे.
होडीला, लाटेशी खेळवत खेळवत हा पुढे चालला आहे.
बरंच अंतर पुढे गेला की हा !

जे कधीच साधत नाही, एवढ्या मोठ्या आयुष्यात। ते सहज मिळून जातं, इवलुल्याशा स्वप्नात।।

स्मरण क्रांतिवीरांचे : फक्रुद्दीन अली अहमद – आसाम – भारत छोडो आंदोलनात सहभाग.

प्रायोजक -डॉ. संदीप श्रोत्री, सातारा.

यात अनेक आवर्तनं झाली की आत्तापर्यंत.
होडी तरी किती अँगलनं फिरवली ह्यानं.
प्रत्येक वेळेला होडीच्या कडेला हाताच्या पंज्यानं ढकलताना... काय याचं शरीर !
हा काही जिमनॅस्ट नाही.
हा काम करतो आहे,
पण एखाद्या निष्णात जिमनॅस्टसारखा हा होडीशी, लाटेशी, पाण्याशी खेळतो आहे.

अत्यंत मन:पूर्वक हा काम करतो आहे.

अत्यंत मन:पूर्वक हा खेळतो आहे.

मघाशी हा एकटा होता.
आता हा एकटा नाही.
आता हा त्रिरूप आहे.
बोट, लाट, हा.
०
याचं स्केच केलं पाहिजे.
बोटीच्या रोबस्ट आकारात,
निळ्याकरड्यांच्या फटकाऱ्यांत,
गडद पांढऱ्यांच्या,
सूर्यास्तांच्या तुकड्यांत,
ओघळा-ओघळांत
या हिरव्या चड्डीवाल्याचं
एकट्याचं
चित्र केलं पाहिजे.
०

***

- चंद्रमोहन कुलकर्णी, ३, श्री. शंकर आनंद पार्क, वाळवेकरनगर, सातारा रस्ता, पुणे 411009

(सौजन्य - कॉल ऑफ द सीज् - मनोविकास प्रकाशन)

झाडे रंगाने रंगली, झाडे गंधाने भारली। सारे घेऊन वैभव, झाडे पाण्यात वाकली।।

स्मरण क्रांतिवीरांचे : खुदीराम बोस - बंगाल - स्वातंत्र्य लढ्यात बॉम्बचा प्रथम वापर.

प्रायोजक - प्रतिभा इलेक्ट्रिकल्स, पुणे.

संग्रामाची पूर्वसंध्या !

– अरविंद भावे

देशाच्या सीमांचं रक्षण करण्यासाठी सतत डोळ्यात तेल घालून आपले जवान सज्ज असतात... अचानक कधीतरी युद्धाची चाहूल लागते. अशा 'संग्रामाची पूर्वसंध्या' ही प्रत्यक्ष संग्रामाइतकीच जवानांच्या दृष्टीने मानसिक, शारीरिक बल टिकवत युद्धाला तयार होण्याच्या दृष्टीने थरारक असते. १९६५ सालच्या भारत–पाकिस्तानच्या संग्रामात प्रत्यक्ष सहभागी असणारे कर्नल अरविंद भावे यांनी हा अनुभव तुमच्यासाठी शब्दबद्ध केलाय. १५ ऑगस्टच्या निमित्ताने देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी तन–मन–धन अर्पून प्रयत्न करणारे शूर–वीर तसेच स्वातंत्र्य टिकवून ठेवण्यासाठी सदैव सज्ज असणारे आपले जवान या सर्वांच्या प्रति, या निमित्ताने आपण कृतज्ञता व्यक्त करूया.

या लेखाचे शीर्षक काहींना साहजिकच निरर्थक आणि असंभव असे वाटेल ! कारण संग्राम अथवा लढाई म्हणजे काही क्रिकेटची मॅच नाही किंवा एखादा ठरविलेला कार्यक्रम नाही जो निश्चित, नियोजित वेळी सुरू होईल...

पण कलियुगापूर्वी धर्मयुद्धाचा काळ असताना युद्धाची धामधूम सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत असायची. त्याकाळी कदाचित, ''उद्या सकाळी युद्धाला प्रारंभ होणार,'' अशी घोषणा करण्याचा प्रघात असावा; म्हणजेच आदल्या दिवशीला 'संग्रामाची पूर्वसंध्या' असे संबोधणे श य असावे.

आता काळ बदलल्याने आणि युद्धाची निश्चित अशी तारीख आणि वेळ कधीही घोषित होत नसल्याने 'संग्रामाची पूर्वसंध्या' केव्हा म्हणायचे, असा प्रश्न उद्‌भवणे साहजिक आहे. पण दोन राष्ट्रांच्या राज्यकर्त्यांची उच्चस्तरीय अशी चर्चा होत असताना, युद्ध लवकरच होणार आणि ते अटळ आहे; अशी एक प्रकारची कुणकुण कुठल्याही देशाच्या सैन्याला जाणवत असते, त्या दृष्टीने सैन्याला सदैव तत्पर आणि प्रयत्नशील असावे लागते. कारण ''आम्ही अजून तयार नाही'', असे देशाच्या सैन्याला कधीही म्हणता येत नाही. त्यांना कुठल्याही क्षणी सीमेवर तैनात होऊन, शत्रूशी मुकाबला करायचा असतो. अशीच राज्यकर्त्यांचीही अपेक्षा असते.



मला आठवते इ. स. १९६५ च्या संग्रामाच्या प्रसंगी आमच्या युनिटची लढाईच्या दृष्टीने जय्यत तयारी चालली होती. त्यावेळी मी तोफखाना युनिटमध्ये कार्यरत होतो. आम्हाला फ त सात दिवसांचा अवधी देण्यात आला होता. 'त्या सात दिवसांत कोणत्याही क्षणी सज्ज होऊन आम्हाला सीमेवर तैनात व्हावे लागेल', अशी ताकीदही मिळाली होती.

युद्ध होणार म्हटल्यावर साहजिकच पहिले पाऊल म्हणून सर्व सैनिकांच्या सुट्ट्या रद्द करण्यात आल्या होत्या. वेळेचं महत्त्व जाणून आमच्या युनिटमधील प्रत्येकजण काळजीपूर्वक आणि प्रामाणिकपणे आपापल्या परीने कामात मग्न होता. मग त्यात हत्यारे, दारूगोळा तपासणे असो, अथवा तोफा वाहून नेणाऱ्या गाड्यांची देखभाल असो. तसेच इतर गाड्या, छावणीकरीता लागणारे आवश्यक सामान, राशनपाणी अशा सर्व उपयु त वस्तूंचा आढावा घेणे चालले होते. कुठे काही त्रुटी आढळल्यास त्या ताबडतोब भरून काढणे ही प्रत्येक विभागाची जबाबदारी होती.

कारण एकदा लढाई सुरू झाल्यावर मग 'मागे पाहणे' साहजिकच अश यप्राय होते. वरिष्ठ अधिकाऱ्यांना युनिटच्या एकूण तयारीसंबंधीची माहिती दररोज कळविणे (सिच्युएशन रिपोर्ट) आवश्यक असायचे. ही सारी कामे करत असतानाच, युनिटचे सर्व जवान आणि अधिकाऱ्यांच्या दैनंदिन कवायती आणि प्रशिक्षण मात्र नेहमीप्रमाणे चालू असायचे. त्यामुळे कुणीही आळसावलेले अथवा मनोबल हरपलेले असे नव्हते. सर्वत्र उत्साहाचे वातावरण असायचे.

कुणी कलंदर वेडा, गीत निसर्गाचे गातो। निळ्या निळ्या पाण्यासंगे, गूज मनीचे सांगतो।।

स्मरण क्रांतिवीरांचे : कन्हैय्यालाल दत्त – बंगाल – सशस्त्र क्रांती लढ्यात सहभाग.

प्रायोजक - श्री. निनाद रामचंद्र कात्रे, डोंबिवली.

त्यातच एक दिवस वरिष्ठांचा हुकूम आला, *''प्लीज एनशुअर कम्प्लीशन ऑफ टिनस्मिथ जॉब !''* म्हणजेच *टिनस्मिथ*चे काम पूर्ण झाल्याचे ताबडतोब कळवा. आता मध्येच हा *टिनस्मिथ* कसा उगवला ते मला तेव्हा उमगले नाही. कारण आमच्या लहानपणी 'कल्हईवाला' बहुधा *'टिनस्मिथ'* म्हणून गणला जात असे. पण नंतर लक्षात आले, की लढाईवर जाताना अधिकारी अथवा जवान कुणीही आपल्या पदाचे अथवा नावाचे छातीवर आणि खांद्यावर कुठल्याही प्रकारे प्रदर्शन करीत नाहीत. लढाईवर जाताना सर्वांचा गणवेष सारखा असतो; पण प्रत्येकाच्या गळ्यात *'टिन'*ची एक गोल आकाराची तबकडी आणि हातामध्ये अंडाकृती अशी तबकडी अडकवलेली असते. त्या तबकडीवर प्रत्येकाचं नाव आणि नंबर कोरलेला असतो; जेणेकरून संग्रामात दुर्दैवाने मृत्युमुखी पडल्यास अथवा शत्रुसैन्याच्या भडिमाराने शरीर छिन्नविच्छिन्न झाल्यास कुठल्याही सैनिकाची ओळख पटण्यास त्रास होत नाही.

पहिली सूचना येऊन जेमतेम तीन दिवसच झाले होते आणि तेवढ्यातच 'उद्या सायंकाळी सात वाजता कूच करण्यास तयार व्हा !' असा तातडीचा हुकूम आला. यालाच सैनिकी भाषेत *'एन. एम. बी.'– 'नो मूव्ह बिफोर'* असंही म्हणतात. मग काय अधिकच धावपळ सुरू झाली. सर्व गाड्या एका ओळीत लावण्यात आल्या. सायंकाळी सहा वाजताच सर्वजण हत्यारे, दारूगोळा, कमीतकमी असे वैयि तिक सामान घेऊन सज्ज झाले. तोफा वाहून नेणाऱ्या गाड्या आणि इतर वाहने मिळून आमच्या युनिटच्या एकूण सत्तरऐंशी गाड्या होत्या. त्यावेळी आम्हा प्रत्येकाजवळ स्वसंरक्षणार्थ स्टेनगन, काडतुसे, पाण्याची बाटली आणि एका पॅकेटमध्ये शंकरपाळ्यासारख्या कणकेच्या चिकवड्या दिल्या होत्या. त्या चिकवड्या पुढील चोवीस तास आम्हाला जेवण म्हणून पुरवायच्या होत्या. कारण सीमेवर पोहोचल्यावर छावणीच्या जागेत स्थिरस्थावर होईपर्यंत आम्हाला निदान २४ तास तरी जेवण मिळायचे नव्हते.

बरोबर सात वाजता निघायचे असल्याने पाच मिनिटे अगोदर सर्व हवालदारांनी जोरजोरात शिट्ट्या फुंकल्या. लगेच सर्वजण आपापल्या गाड्यांमध्ये स्थानापन्न झालो. त्यावेळी 'हर हर महादेव', 'जो बोलो सो निहाल–सत्श्री अकाल' अशा गर्जना सर्व सैनिकांनी केल्या आणि आम्ही मार्गस्थ झालो. आमच्या त्या लांबलचक गाड्यांच्या रांगेत प्रथमस्थानी कमांडिंग ऑफिसर साहेबांची जीप होती आणि त्या जीपवर हिरवा झेंडा होता. शेवटची गाडी ही दुरुस्त करणाऱ्या तंत्रज्ञांची (मेकॅनि सची) होती. त्यावर 'ऑल िलिअर' अशा निर्देशनाचा निळा झेंडा होता.

त्यावेळी युद्धाच्या बाबतीतील कुतूहल आणि हुरहूर आमच्या मनात होती; पण चिंता मात्र अजिबात नव्हती. कारण 'विजय आपलाच होणार' अशी सर्वांना खात्री वाटत होती ! श यतो शत्रूला आमच्या मोहिमेची जाणीव होऊ नये; म्हणून आमच्या त्या मार्गस्थ पलटणीला सूर्योदयापूर्वी सीमेवर आपल्या इष्टस्थळी पोहोचणे आवश्यक होते. त्या दिवशी छावणी साकारल्यावर प्रथमच आम्हाला वरण–भाताचे असे साधे जेवण रात्रीच्या वेळी मिळाले. त्या अगोदर निघाल्यापासून 'भूक लागेल तेव्हा थोड्या चिकवड्या खाऊन आणि दोन घोट पाणी पिऊन भूक शमविण्यामुळे सर्वांनाच आता सपाटून भूक लागली होती.

नव्या ठिकाणी आणि विशेषकरून सीमेवर तैनात असल्यामुळे रात्रपाळीकरता सर्वत्र जवान ड्यूटीवर लावणे आवश्यक होते. घाईघाईने काही तंबू लावण्यात आले होते; पण 'सूर्योदयापूर्वी ते सारे जमीनदोस्त करण्यात यावे,' अशी वरिष्ठांकडून स त ताकीद मिळाली होती. त्यामुळे आमची छावणी शत्रूच्या नजरेत आली नसती.

दुसऱ्या दिवशी आमच्या छावणीच्या पूर्ण परिसराची पाहणी करत असताना पाकिस्तानचे राष्ट्रपती जनरल अयूबखान यांनी भारताशी युद्ध पुकारले आहे, अशी बातमी दुपारी दोनच्या सुमारास अचानक आली. लगेचच युद्धाची धुमश्चक्री सुरू झाली. पण संग्रामाच्या पूर्वसंध्येला जेवढी अशाश्वतता, चिंता आणि हुरहूर सैनिकांच्या मनात वाटत असते, ती सारी हुरहूर एकदा सुरू झाल्यावर खचितच नसते. असा आम्हा सर्व सैनिकांचा अनुभव आहे.

***

– अरविंद भावे (सेवानिवृत्त कर्नल)
Flat No.106, Daisy Block, L & T
Serene County, Gachibowli , Hyderabad - 32

दूर क्षितिजी महिरप, झाडांची नक्षीदार। कोवळ्या गवतावर खुले, फुलांची आरास छानदार ॥

स्मरण क्रांतिवीरांचे : बटुकेश्वर दत्त – बंगाल – सेंट्रल असेंबलीवर बॉम्ब हल्ल्यात सहभाग.

प्रायोजक - संतुल, (श्री. मिलिंद संत), पुणे.

गोविंदा ऽऽ रे गोपाळाऽऽ

– महेश केळुसकर

धो धो पावसाचा आषाढ संपून श्रावण सुरू झालेला असायचा..

‘क्षणात येते सरसर शिरवे,
क्षणात फिरूनी ऊन पडे...’

अशी मज्जा सुरू झालेली असायची. श्रावणात पहिल्यांदा नागपंचमी यायची. हळदीच्या पानातले गोड गोड पातोळे आम्हाला खायला मिळायचे. मग यायची नारळी पौर्णिमा. मनगटापासून कोपरापर्यंत वेगवेगळ्या रंगांच्या राख्यांनी हात भरून जायचा. मुख्य म्हणजे या दिवशी नारळाच्या खोबऱ्याच्या वड्यांचं आम्हाला आकर्षण असायचं. मग जास्त वाट न बघता श्रावण वद्य अष्टमीला यायची श्रीकृष्ण जयंती आणि त्याच्या दुसऱ्या दिवशी गोपाळकाला.

कंसाची बहीण देवकी आणि तिचा पुत्र श्रीकृष्ण; पण कंस त्याला मारेल या भीतीने, जन्म होताच सुदैवाने त्याला नंदाच्या घरी नेऊन ठेवला. यशोदेनं त्याला वाढवला म्हणून त्याला यशोदालाल म्हटलं जातं. कृष्ण खोडकर होता आणि तेवढाच हुशार. दुधा-तुपाचं सात्विक अन्न खाऊन तो सश त झाला आणि मल्लविद्येत पारंगत झाला. आपला बंधू बलराम याच्या साहाय्याने कंसाचे आपल्याला ठार करण्याचे सारे कुटील डाव त्यानं उधळून लावले. पुढे कंसाचा वध केला.

सांदिपनी गुरुंच्या आश्रमात श्रीकृष्णानं वेदाध्ययन केलं. आणि तिथंच तो धनुर्विद्या शिकला. कौरव-पांडवांच्या युद्धात त्यानं पांडवांची बाजू घेतली आणि अर्जुनाला ‘भगवद्‌गीता’ सांगितली. श्रीकृष्णानं जो उपदेश केला तो आजही प्रमाण मानला जातो. उपनिषदं आणि योगाचा अभ्यास करून तसं आचरण करणाऱ्या श्रीकृष्णाचा जन्मोत्सव म्हणूनच संपूर्ण देशात उत्साहानं साजरा केला जातो. वृंदावन, गोकुळ, मथुरा, द्वारका, जगन्नाथपुरी यांसारख्या ठिकाणी तर कृष्णभ तांच्या उत्साहाला उधाण आलेलं असतं.

कृष्णजयंतीच्या दिवशी आमची आई शेवग्याच्या पानांची भाजी करायची, संपूर्ण दिवसाच्या उपवासानंतर ती चविष्ट भाजी, ज्वारीच्या गरम भाकऱ्यांबरोबर खाताना, कृष्ण किती साधा राहायचा, त्या गोष्टी आम्हाला सांगायची. आमच्या गावात राधाकृष्णाचं देऊळ आहे. गोकुळाष्टमीला मध्यरात्री त्या देवळात कृष्णजन्माचे पाळणे म्हणत. त्यानंतर सुंठवडा खायला आम्ही पोरं हजर असायचो.

दुसऱ्या दिवशी गोपाळकाला असायचा. मारुतीवाडीत एक आणि बाजारपेठेत चार अशा संपूर्ण गावात फ त पाच दहीहंड्या बांधलेल्या असायच्या. अगदी तीन-चार थरांच्याच उंचीपर्यंत.

धूसर धूसर पहाट आली, अधरावर बासरी बिलगली। कान्हयाने हळू सूर लावता, विश्वामाजी प्राण जागला।।

स्मरण क्रांतिवीरांचे : चित्तरंजन दास – बंगाल – प्रिन्स ऑफ वेल्सच्या कलकत्यातील आगमनावर बहिष्कारात महत्त्वाचा वाटा.

प्रायोजक - सौ. नंदिता सदाशिव वझे, पुणे.

छोट्या मड या झेंडूच्या फुलांच्या माळांनी सजवलेल्या असायच्या. प्रत्येक हंडीच्या गळ्यात गोड बत्ताशांची माळही असायची. हंडीत दही आणि त्यावर आंब्यांच्या पानांच्या कोंदणात नारळ ठेवलेला. बाजारपेठेतले व्यापारी एक, दोन आणि पाच रुपयांच्या नोटांची रिंगणमाळ हंडीच्या गळ्यात बांधायचे. जास्तीत जास्त रकमेची हंडी असायची पंचवीस रुपयांची.

कााल्याच्या दिवशी सकाळी ढोलकी वाजवत, मोठमोठ्यानं देवाचे गजर करीत पोरांच्या टोळ्या निघायच्या,

'घरात नाही पाणी
घागर उताणी रे, गोपाळाऽऽ
गोविंदा रे, गोपाळाऽऽ
यशवदेच्या बाळाऽऽ'

अशी गाणी म्हणत पोरं घरासमोरच्या अंगणात नाचत राहिली म्हणजे घरातल्या बायका कळश्या नि घागरी बाहेर आणून त्यांच्या माथ्यावर ते सगळं पाणी ओतणारच... एवढ्यावर पोरांचं भागायचं नाही. त्यांना गूळ खोबऱ्याची खिरापत लागायची. आणि हो, जोपर्यंत हातावर दही पडत नाही तोपर्यंत 'गोविंदाऽऽ रे गोपाळाऽऽ' सुरूच–

असं प्रत्येक घरी गूळ–खोबरं खात गोपाळमंडळी अखेरीस दहीहंडी बांधलेल्या ठिकाणी पोचायची. त्यावेळी रेकॉर्डसचा गोंगाट नव्हता. सगळे गोपाळ ढोलकीच्या भोवती फेर धरून गाणी म्हणायचे नि मग थरावर थर लावायचे. बघ्यांची गर्दी तर असायचीच नि त्या गर्दीतून, *'बाळ्या– मेल्या सांबाळून चड... नाय तर चड्डी टरकात'* किंवा 'शाबास – हां वायच आणखी थोडो जोर लाव पांडग्या – भिया नुको' असे सल्ले आणि प्रोत्साहनाचे आवाज येत राहायचे. एखाद दुसऱ्या वेळी थर कोसळायचेही, पण कुणाला कधी दुखापत व्हायची नाही. मामुली खरचटायचं – बिरचटायचं. पण उंचावरून पडून कधी कोणाचा हात–पाय मोडला किंवा कपाळमोक्ष झाला, असं झालं नाही. दहीहंडी फोडून सगळेजण आनंद करायचे. गुण्या–गोविंदाने जे मिळेल ते वाटून घ्यायचे.

आमच्या गावातल्या बाजारपेठेत दहीहंडीच्या दिवशी आणखी एक मजेदार खेळ बघायला मिळायचा. गावात नारळ विकणारे खूप व्यापारी होते. ते आपली नारळांची पोती आपापल्या दुकानांच्या पुढच्या ओसरीत आणून ठेवायचे. दुकानांच्या समोरच्या रस्त्यावर नारळावर नारळ आपटून आपापली ताकद दाखवून देणारे २–२ खेळाडू असायचे. कधी–कधी एखादा दांडगट ४–४ तास खेळत राहायचा. शे–दोनशे नारळ फोडून खेळायला येणाऱ्या सगळ्यांना तो हरवायचा. मग ते

इथे फुलांपरी मुले कणाकणाने फुलतात। आणि तारूण्याचे हात नवे आभाळ झेलतात।।

स्मरण क्रांतिवीरांचे : सच्चिंद्रनाथ सन्याल – बंगाल – काकोरी कटात सहभाग.

प्रायोजक - डॉ. संतोष काकडे, नागपूर.

सगळे फोडलेले नारळ पुन्हा दुकानदारालाच विकायचा आणि शे-दोनशे रुपये खिशात टाकून मजेत निघून जायचा. आपण विकत घेतलेला मूळ नारळ मात्र तो परत करायचा नाही. दरवर्षी हा नारळाचा खेळ बघायला दहीकाल्याच्या दिवशी पोरा-टोरांची आणि मोठ्या माणसांचीही फुल्ल गर्दी गावातल्या रस्त्यावर असायची.

माझ्या लहानपणीच्या दहीहंडीत आणि आताच्या दहीहंडीत किती फरक पडलाय...! ज्या ठाणे शहरात सध्या मी राहतो, तिथं तर दहीहंडीच्या दिवशी घरातून बाहेर पडावंसं वाटत नाही. एक लाख, पाच लाख, दहा लाख अशा बक्षिसांची आमिषं असलेल्या दहीहंड्या उंच उंच टांगलेल्या असतात. आपल्या भ्रष्टाचारी श्रीमंतीचं हिडीस प्रदर्शन करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांनी, त्या प्रायोजित केलेल्या असतात. दहीहंडीसमोर उंच स्टेज असतं. त्या स्टेजवर बाजारू नट-नट्या नाचत असतात आणि लोक टाळ्या पिटत असतात. *डीजेचा* आवाज किंचाळत असतो. दहीहंडी कार्यक्रमाचा*अँकर* असतो, तो काहीतरी फालतू विनोद करत असतो. त्यानंतर रंगीबेरंगी बनियन्स घातलेले गोपाळ येतात. उंचच्या उंच बांधलेली हंडी फोडण्यासाठी ते थर रचायला लागतात. कधी पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे सगळा मनोरा कोसळून एखादा गरीब गोपाळ कायमचा आयुष्यभरासाठी पंगू होतो किंवा कधी-कधी एखाद्याचा प्राणही जातो.

माझ्यासारख्याला ही होर्डिंगबाज, किंचाळत राहणारी, पैशांसाठी हावरट झालेली दहीहंडी पसंत नाही. श्रीकृष्ण आपल्या सवंगड्यांबरोबर दहीहंडीचा खेळ खेळायचा. ते सगळे गायचे-नाचायचे.., संघभावना दाखवून द्यायचे. त्याच एकजुटीनं दुष्टांना धडा शिकवायचे. पण आताची दहीहंडी *कमर्शियल* झाली आणि तो खेळातला आनंद संपला-मजा संपली - निर्मळपणाची बासरी हरवली.

पण मला आशा आहे की पुन्हा एकदा तो ओळखीचा जुना कृष्ण माझ्या पाठीवर थाप मारून म्हणेल - 'अरे, घाबरतोस कशाला?' मी आहे ना सगळं ठाकठीक करण्यासाठी... मी म्हणून ठेवलंय कधीच -

'धर्मसंस्थापनार्थाय
संभवामि युगे युगे ।।'

***

- महेश केळुसकर
२०३, रामेश्वर, धोबी आळी,
चरई, ठाणे (प.) ४००६०१



रानपाखरू एकटे, शीळ घालत उडते। त्याची इवली प्रतिमा, रेघ पाण्यात ओढते ।।

स्मरण क्रांतिवीरांचे : पोट्टी श्रीरामुल - आंध्रप्रदेश - मीठाचा सत्याग्रह व भारत छोडो आंदोलनात सहभाग.

प्रायोजक - व्ही. व्ही. आर्किटे ट प्रा. लि., पुणे.

महान गणितज्ञ 'भास्कराचार्य' – ९ (नऊशेव्या जयंतीनिमित्त)

छात्र प्रबोधनच्या **सौर ज्येष्ठ (जून २०१४)** च्या अंकात पान क्र. २७ वरील भास्कराचार्यांच्या लीलावतीमधील कूटप्रश्न दिला होता तो असा – *एका गृहस्थाने पहिल्या दिवशी ४ द्रम्म (त्यावेळचे चलन, आपण सोयीने रुपये धरू) म्हणजेच ४ रु. (ब्राह्मणाला) दान दिले. पुढे प्रत्येक दिवशी ५ अधिक याप्रमाणे १५ दिवस तो दान देत होता. तर त्याने एकूण किती रुपये (द्रम्म) दान दिले?* तुम्ही सोडवला का हा प्रश्न? सोडवण्याची भास्कराचार्यांची रीत पुढे दिली आहे. तुमच्या रीतीशी ती ताडून पाहा.

उत्तर – सुरुवातीचे दान = ४, दुसऱ्या दिवशीचे दान = ४ + ५ = ९, तिसऱ्या दिवशीचे दान = ९ + ५ = १४ असे काढून बेरीज करून उत्तर काढता येऊ शकेल. मात्र १५ दिवसांऐवजी एक महिना, ३ महिने, वर्षभर दान दिले असा प्रश्न आला तर भंबेरी उडेल.

आज ज्याला A. P. (Arithmetic Progression) म्हटले जाते, त्याची सूत्रे भास्कराचार्यांनी समजावली आहेत.
जर सुरुवातीची संख्या (आदि) = ४ (a), वाढ (चय) = ५ (d), किती वेळा (गच्छ)= १५ (n)

तर 'न' क्रमांकाच्या दिवशीचे दान = (आदि) + (गच्छ – १) × चय

सूत्रानुसार, सहाव्या दिवशीचे दान = ४ + (६ – १) × ५ = ४ + ५ × ५ = २९
प्रत्यक्ष मोजून पाहिले तर ४, ९, १४, १९, २४, २९, म्हणजे सूत्रानुसार उत्तर बरोबर आहे.

१५ दिवसात दिलेले एकूण दान = सर्व पदांची बेरीज = **सर्वधन = $\frac{\text{गच्छ}}{२}$ [२ × आदि + ((गच्छ – १)× चय)]**

सर्वधन = $\frac{१५}{२}$ [२ × ४ + ((१५ – १) × ५)]= $\frac{१५}{२}$ (८ + (१४ × ५))

= १५ (४ + (७ × ५)) = १५ × ३९ = ५८५

तुम्हाला माहीत असलेली सूत्रे – $a_n = a + (n - 1) \times d$

$$S_n = \frac{n}{2}\left[2a + (n - 1) \times d\right]$$

सोडवा पाहू कूटप्रश्न – क्र. २ : *कमळांच्या राशीत काही कमळे होती. त्यातील एक तृतीयांश शंकरास वाहिली, एक पंचमांश कमळे विष्णूस वाहिली, एक षष्ठांश सूर्यास वाहिली, एक चतुर्थांश देवीस अर्पण केली व राहिलेल्या ६ कमळांनी गुरुचरणांची पूजा केली तर कमळे किती होती, ते झटकन सांगा.*

भास्कराचार्यांनी दिलेल्या कूटप्रश्न सोडवण्याच्या रीतीचे मराठी स्पष्टीकरण – **किरण बर्वे**
रमा, १६ ब, गल्ली क्र. ९, शिक्षकनगर, कोथरुड, पुणे – ३८

पु. ल. उवाच...

थोर साहित्यिक पु. ल. देशपांडे यांचा वाढदिवस होता. त्यानिमित्ताने एका मार्केटयार्डाच्या व्यापारी चाहत्याने त्यांच्या गळ्यात सफरचंदाचा हार घातला. पु. ल. त्या वजनाने थोडे झुकले. हे बघून व्यापारी म्हणाला, ''काय राव, काय झाले येवढे झुकायला?''
पु. लं. म्हणाले, ''बरे झाले तुम्ही नारळाचे व्यापारी नाही.'' त्याबरोबर एकच हशा पिकला होता !

कधी रिमझिम सरी, कधी सरसर धारा। कधी नुसतंच दाटून यायचं, तर कधी टपोर गारा।।

स्मरण क्रांतिवीरांचे :स्मरण क्रांतिवीरांचे : सी. सुब्रमण्यम् – तामिळनाडू – असहकार चळवळीत सक्रीय सहभाग.

प्रायोजक - श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे.

केंद्रीय अर्थसंकल्प २०१४-१५

– प्रफुल्ल कुलकर्णी

नुकत्याच लोकसभेच्या निवडणुका झाल्या व मे महिन्यात नरेंद्र मोदी यांच्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार अस्तित्वात आले. या सरकारने आपला पहिला अर्थसंकल्प १० जुलै २०१४ ला संसदेमध्ये सादर केला. जाणून घेऊया, त्या अर्थसंकल्पातील काही ठळक मुद्दे.

लोकशाहीमध्ये कोणतेही सरकार एकदा निवडून आले, म्हणजे संकल्पित योजनांना लागणाऱ्या पैशाची उभारणी कशी करणार व ते कसे खर्च करणार याचे विस्तृत निवेदन संसदेत करावे लागते. त्याला कायदेशीर मान्यता घ्यावी लागते. त्यालाच अर्थसंकल्प मांडणे व नंतर वित्त विधेयक मंजूर करून घेऊन, त्यास कायद्याचे रूप देणे असे म्हणतात.

अर्थसंकल्पाचे दोन प्रमुख भाग असतात–

एक उत्पन्नाचा व दुसरा खर्चाचा. सरकारला त्यांच्या योजना राबविण्यासाठी, सरकारचा दैनंदिन कारभार चालवण्यासाठी उत्पन्नाची आवश्यकता असते. हे उत्पन्न त्यांना विविध प्रकारच्या करांमधून – अबकारी कर, आयात कर, आय कर, विक्री कर इ. मधून तसेच सरकारी उद्योगांच्या नफ्यामधून, परदेशस्थ भारतीयांनी भारतात पाठवलेल्या पैशांमधून मिळत असते. परंतु हे उत्पन्न सरकारच्या विविध योजनांसाठी पुरत नाही, त्यामुळे दरवर्षी सरकार प्रचंड कर्जे घेते. ही कर्जेसुद्धा सरकारच्या उत्पन्नात धरली जातात. (तुम्ही–आम्ही आपल्या वैयक्तिक अर्थसंकल्पात कर्जे कधीच उत्पन्नाचा भाग म्हणून धरू शकत नाही; पण सरकार मात्र तसे करते.) म्हणजे दरवर्षी सरकार नवी कर्जे घेते व मागील कर्जे फेडते. त्यामुळे घेतलेली कर्जे उत्पन्नात व फेडलेली कर्जे खर्चात धरली जातात. एवढे करूनही जी तूट राहते, ती भागवण्यासाठी सरकार चक्क नव्या नोटा छापते.

सरकारचे खर्च हे साधारणपणे असे असतात :

- चालू असलेल्या व नवीन प्रकल्पांवरील खर्च उदा. धरणे, रस्ते, बंदरे, रेल्वेमार्ग, विमानतळ, वीजनिर्मिती केंद्र, शैक्षणिक संस्था इ. ची उभारणी.
- सरकारच्या स्वत:च्या आस्थापनांवरील खर्च उदा. सरकारी नोकरांचे पगार, देखभाल खर्च इ.
- पूर्वी घेतलेल्या कर्जांच्या परतफेडी.
- पूर्वी घेतलेल्या कर्जांवरील व्याज.
- संरक्षण, दळणवळण इ. राष्ट्रीय कर्तव्यांवरील खर्च.

नवनिर्वाचित पंतप्रधान नरेंद्र मोदी आता आपल्या पहिल्या अर्थसंकल्पात काय मांडतात, याविषयी सर्व देशात कमालीची उत्सुकता होती. कारण सामान्य जनतेने चांगल्या दिवसांच्या आशेने या सरकारला निवडून दिले आहे. वर उल्लेख केलेल्या सगळ्या योजनांवरचा सरकारचा २०१४–१५ या काळात अपेक्षित खर्च आहे १७.९५ लक्ष कोटी रुपये व सर्व प्रकारचे कर, सरकारी उद्योगांच्या नफ्यातील लाभांश, व्याज इ. चे उत्पन्न आहे फक्त ११.९० लक्ष कोटी रुपये. म्हणजेच ६.०५ लक्ष कोटी रुपये एवढी प्रचंड तूट आहे. ही तूट सरकार नवी कर्जे उभारून, परदेशी संस्था, अनिवासी भारतीय इ. कडून गुंतवणुकीसाठी येणाऱ्या रकमा यांतून व काही प्रमाणात नवीन नोटा छापून भरून काढणार आहे.

या पार्श्वभूमीवर मोदी सरकारच्या **२०१४–१५ च्या अर्थसंकल्पात ठळक बाबी काय आहेत ते बघूया.**

*** मनुष्यबळ विकासावर भर**

जगातल्या कोणत्याही मोठ्या देशापेक्षा भारताच्या लोकसंख्येमध्ये तरुणांचे (म्हणजेच काम करणाऱ्यांचे) प्रमाण जास्त आहे. अन्य देशांमध्ये (आयुर्मर्यादा वाढल्यामुळे) तरुणांवर अवलंबून असणाऱ्या वृद्धांचे प्रमाण वाढले आहे. आपल्याकडे तरुणांचे प्रमाण जास्त असले, तरी त्यांच्याकडे काम करण्यासाठी लागणाऱ्या

स्वप्नांसाठी खुले असतात चढणीचे रस्ते। उतरणीची वाट कधी स्वप्नांसाठी नसते।।

स्मरण क्रांतिवीरांचे : सी. राज गोपालाचारी – तामिळनाडू – वेदरान्यम् मीठाचा सत्याग्रह व वैकोम सत्याग्रहात सहभाग.

प्रायोजक - कु. रेवती सारंग वऱ्हाडपांडे, पुणे.

कौशल्यांचा अभाव आहे. ते पुरेसे शिकलेले नाहीत. ते निरोगी नाहीत. त्यामुळे मनुष्यबळदर्जामध्ये भारताचा क्रमांक १८० देशांमध्ये १३६ वा लागतो. याचाच अर्थ आपल्याकडे मनुष्यबळ विकासाची तीव्र आवश्यकता आहे. यासाठी या अर्थसंकल्पात पुढील प्रमुख उपाययोजना आहेत -

- पाच IIT, पाच IIMs, बारा वैद्यकीय महाविद्यालये, पंधरा स्वास्थ्यचिकित्सा संशोधन केंद्रे यांची उभारणी.
- युवकांसाठी व्यावसायिक कौशल्ये-शिक्षण केंद्रे स्थापन करणार.
- दिल्लीतील राष्ट्रीय वैद्यकीय संस्थेच्या धर्तीवर चार संस्था चार दिशांना काढणार.
- सर्वांना शिक्षण मिळावे म्हणून शैक्षणिक खर्चासाठी कर्जामध्ये सुलभता आणणार.

※ पायाभूत सुविधांचा विकास -

देशाच्या विकासाला चालना देण्यासाठी काही मूलभूत-पायाभूत अशा सुविधांची गरज असते. त्यांचा अभाव असेल तर विकासाची गाडी अडते. उदा. चांगले रस्ते नसतील तर मालवाहतूक संथ होते. व्यापाराचा वेग अडतो. लांबच्या बाजारांमध्ये माल पोहोचू शकत नाही. त्यामुळे विकासाला मोठ्या प्रमाणावर गती मिळावी म्हणून पायाभूत सुविधांच्या विकासासाठी (Infrastructure Development) पुढील योजना आखल्या आहेत.

- ८,५०० कि.मी.चे राष्ट्रीय महामार्ग बांधणे.
- छोट्या शहरांसाठी विमानतळ बांधणे.
- सोळा नवीन बंदरांचा विकास करणे.
- पंधरा हजार कि.मी. च्या गॅसच्या पाईपलाईन्स टाकणे.
- सौर, पवन, जल, औष्णिक ऊर्जानिर्मितीसाठी विविध योजना व सवलती.
- अतिजलद रेल्वे गाड्या, ज्यात मुंबई- अहमदाबाद बुलेट ट्रेनचा समावेश.
- शंभर स्मार्ट शहरांच्या उभारणीचा प्रस्ताव.

※ उद्योगधंद्यांच्या विकासाला चालना -

उद्योग वाढले, निर्यात वाढली, आयातीचे प्रमाण कमी झाले तरच देशातील लोकांना रोजगार मिळतो. करांचे उत्पन्न वाढते. देशभर सुविधांचे जाळे उभारता येते. एकूण राष्ट्रीय उत्पन्नामध्ये हॉटेल्स, पर्यटन, स्वास्थ्यविषयक सेवा यांचा वाटा २/३ पेक्षा जास्त असतो. त्यामुळे उद्योग व सेवा यांना चालना देण्यासाठी अर्थसंकल्पात पुढील तरतुदी आहेत.

- जेथे वीज, दळणवळण, वाहतूक, रस्ते यांनी अनेक औद्योगिक केंद्रे एकमेकांशी जोडली जातील अशा राष्ट्रीय उद्योग पट्ट्यांची (National Industrial Corridors) उभारणी.
- याच धर्तीवर माल वाहतुकीसाठी रेल्वेच्या पट्ट्यांची उभारणी.
- नवीन उद्योगधंदे काढण्यासाठी उद्योजकांना प्रोत्साहन मिळावे, धंद्यातील जोखीम झेलता यावी, यासाठी छोट्या उद्योजकांना जोखीम भांडवल (Venture Capital) पुरवणार.
- वीजनिर्मितीतील गुंतवणुकीस पुढील दहा वर्षे कर सवलत.
- कोळसा उत्पादन व वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी प्रयत्न.
- बांधकाम उद्योगाला चालना देण्यासाठी गृह कर्जावरील व्याजामध्ये करसवलती.
- विमा व संरक्षण उत्पादन उद्योगांमध्ये परकीय भांडवल एकूण भांडवलाच्या ४९% पर्यंत (FDI) वाढवायला परवानगी. *फॉरेन इन्व्हेस्टमेंट प्रमोशन बोर्ड* त्याचे नियमन करेल. अपुऱ्या भांडवलामुळे त्रस्त असलेल्या विमा कंपन्यांना यामुळे दिलासा मिळेल. हा या अर्थसंकल्पाचा सकारात्मक पैलू म्हणता येईल.

※ दुर्बल व पीडित समाजघटकांकडे लक्ष -

देशाचे उत्पन्न वाढले, पण मूठभर लोकांचाच विकास झाला तर ते अन्यायकारक होईल. त्यामुळे समाजातील सर्व घटकांचा विकास होण्यासाठी काही विशेष तरतुदी केल्या आहेत.

- यंदा प्रथमच, काश्मीरमधील अतिरे यांमुळे निर्वासित झालेल्यांसाठी 'पुनर्वसन योजना.'
- अंधांसाठी चलनातील नोटांवर ब्रेल लिपीचा वापर.
- मुली व स्त्रियांच्या आरोग्य व शिक्षणासाठी

वनदेवीच्या हिरव्या स्वप्नी, मन माझे हे भुलते गं। नादमयी त्या भ्रमरसुरांनी, सूरबावरी बनते गं।।

स्मरण क्रांतिवीरांचे : लक्ष्मी सेहगल - तामिळनाडू - राणी झाशी रेजिमेंटच्या कॅप्टन.

प्रायोजक - श्री. सुरेंद्र कापसे, प्रिन्स्टन, अमेरिका.

बेटी बचाओ योजना. सार्वजनिक वाहनांमधील स्त्रियांच्या सुरक्षिततेसाठी तरतूद.

- अपंगांसाठी क्रीडाकेंद्रे.
- अनुसूचित जाती/जमाती, अल्पसंख्यांक, अपंग इ. घटकांसाठी विकास कार्यक्रमांच्या विशेष तरतुदी.

*** करप्रणालीविषयक धोरणे –**

विकास कार्यक्रमांना भांडवल लागते. ते भांडवल जनतेने बचत केली तरच उभे राहते. म्हणून बचतीसाठी अनेक करसवलती दिल्या आहेत.

- पब्लिक प्रॉव्हिडंट फंडासारख्या योजनांमधील करमु त गुंतवणुकीची मर्यादा रु. १.०० लक्षवरून वाढवून रु. १.५० लक्षपर्यंत नेली आहे.
- किसान विकास पत्र योजनेचे नूतनीकरण.
- सर्वंकष प्रत्यक्ष करप्रणालीकडे वाटचाल.
- सर्व भारतात सुटसुटीत व एकाच प्रकारचे व दराचे कर असावेत म्हणून एकच वस्तू आणि सेवाकर *(Goods & Services Tax)* आणण्याची तयारी. यामुळे उत्पादन शुल्क, आयात कर, सेवा कर इ. अनेक कर जाऊन एकाच दराचा, एकच कर भारतभर लागू होईल. यामुळे माल वाहतूक व विक्री सुटसुटीत होईल आणि उद्योग व धंद्यांना मोठ्या प्रमाणावर चालना मिळेल.
- याशिवाय सर्वसामान्यांना दिलासा म्हणून व्य तिगत उत्पन्नावरील आयकर रु. २.०० लक्ष उत्पन्नाऐवजी रु. २.५० लक्ष व त्यापुढील उत्पन्नाला लागू होईल. ज्येष्ठ नागरिकांची करमु त उत्पन्नमर्यादा अडीच लाखांवरून तीन लाखांवर केली आहे.

*** शेती व ग्रामविकसनाला महत्त्व –**

भारतात अजूनही निम्म्यापेक्षा जास्त लोकसंख्या ग्रामीण भागात आहे. ती शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळे त्यांच्यासाठी खालील प्रकारच्या विकास कार्यक्रमांचा अंतर्भाव अर्थसंकल्पात केला आहे

- ग्राम सडक योजनेअंतर्गत अगदी छोट्या गावांपर्यंत सडका बांधण्यासाठी राज्यसरकारांना अर्थपुरवठा करणे.
- खेड्यांमध्येसुद्धा रस्ते, स्वच्छता, सांडपाणी, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, शिक्षण, आरोग्य या नागरीसेवा पुरवणे.
- शेती व फळबाग संशोधनासाठी विद्यापीठे व संशोधन केंद्रे स्थापन करणे.
- शेतमाल साठवणुकीसाठी प्रगत गोदामे बांधणे.
- शेतकऱ्यांना सुलभ कर्ज व भांडवल पुरवठ्याच्या सोयींसाठी नाबार्ड या संस्थेमार्फत अनेक योजन राबवणे.
- शेतीचे राष्ट्रीय उत्पन्न दरवर्षी ४% वाढवण्यासाठीच्या योजना.

*** स्वच्छतेचा विचार –** आजपर्यंतच्या कोणत्याच सरकारने या विषयाला एवढे महत्त्व दिले नव्हते.

- गंगा नदीसह अनेक नद्यांची व त्यांच्यावरील घाटांची स्वच्छता. त्यासाठी २०३७ कोटी रुपयांची तरतूद.
- रेल्वेस्थानकांची स्वच्छता.
- ग्रामीण सांडपाणी व स्वच्छता योजना इ.

अशा रितीने भारताच्या विकासाला चालना देणे, सरकारी योजनांची कार्यक्षमता वाढवून उत्पन्न वाढवणे व त्यामुळे आर्थिक तूट कमी करून ती आपल्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या ४.१% पेक्षा खाली आणणे, ही उद्दिष्टे आहेत. त्यामुळे वस्तूंच्या किंमतीची वाढ *(Inflation)* रोखणे श य होणार आहे.

या अर्थसंकल्पातील काही त्रुटीसुद्धा मांडल्या आहेत.

- सुटसुटीत प्रत्यक्ष करप्रणाली *(Direct Tax Code)* लवकर लागू व्हावी.
- एकच राष्ट्रीय *Goods and Service Tax* बाबत नुसती घोषणा झाली आहे ती लवकर लागू व्हावी.
- पूर्वीच्या सरकारने केलेले उद्योगधंद्यांना जाचक असे कायदे त्वरित रद्द करावेत. ज्यामुळे परकीय गुंतवणूकदार भारतात मोकळेपणे भरपूर गुंतवणूक करतील व येथे उद्योग वाढतील.

सरकारी कामातील मरगळ दूर व्हावी, निर्णय झटपट व्हावेत अशीच सर्वांची आता अपेक्षा आहे. यापुढील काळात या आघाड्यांवर सरकार काम कसे करते, यावर या अर्थसंकल्पाचे व सरकारचे यश अवलंबून आहे.

– प्रफुल्ल कुलकर्णी
'अनंत', १३ भरतकुंज –२, एरंडवन,पुणे 411038

घ्यावे मनात पेरून, पाखरांचे मुग्ध गान। शीळ वाऱ्याची निर्भय, रूळावी ह्या ओठांतून॥

स्मरण क्रांतिवीरांचे : संगोली रायण्णा – कर्नाटक – कित्तूर स्वातंत्र्य लढ्यात सहभाग, कित्तूरचा किल्ला जिंकला.

प्रायोजक - श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे.

एकरूप



कोरडीठाक उदास नदी
दुथडी भरून
हसत सुटली
माना टाकलेल्या पिकांनाही
तरारून बोलण्याची
वाचा फुटली

विस्कटलेल्या घरट्यातलं पाखरू
खुशीत येऊन
झाडावर बसलं
डोंगर, दरी, रान अख्खं
आभाळाकडं पाहून
खुदकन हसलं

जीवाचा घोर मिटून आता
आशेचा अंकुर
रुजून आला
काळजी वाहणारा मातीशी आज
पुन्हा एकदा
एकरूप झाला.

– एकनाथ आव्हाड
अ/ भाग्यवान सोसायटी, खारदेवनगर, एन. जी. आचार्य मार्ग, चेंबूर, मुंबई 400071

वैजनाथ दुलंगे/मधुजा पारगावकर

सारी उन्हाची तलखी, दूर गावात ठेवून। वाटे विहरत जावे, हिरव्या रानावनातून।।

स्मरण क्रांतिवीरांचे : उमाजी नाईक – महाराष्ट्र – युरोपियनांना महसूल न देण्याचा जाहिरनामा काढला.

प्रायोजक - श्री. अजित भिडे (डायरे टर, ॲसेंट हॉस्पिटॅलिटी प्रा.लि. ☎ २५३८०४०६) **पुणे.**

श्रावण महिना हा विविध सणांचा, व्रतवैकल्यांचा महिना. त्या व्रतवैकल्यांचे महत्त्व सांगणाऱ्या कहाण्या हे शब्दलालित्यानं भरलेलं एक समृद्ध वाङ्मयीन दालन, समाजदर्शन, भावदर्शन, तत्वदर्शन, उभे करणाऱ्या जगण्यातली मूल्य सांगणाऱ्या या कहाण्या आज लोकजीवनातून हळूहळू हरवू लागल्या आहेत.
या कहाण्यांचं सौंदर्य डॉ. रामचंद्र देखणे यांनी अतिशय रसाळ भाषेत उलगडून दाखवलंय !

साठा उत्तराची 'कहाणी'

– डॉ. रामचंद्र देखणे

कधीकधी मला माझा लहानपणीचा श्रावण आठवतो. त्या आठवणींच्या श्रावणात आजही मी मला विसरून जातो. माझ्या मनात 'श्रावण' घर करून राहातो तो अनेक गोष्टींमुळे. बरसणाऱ्या श्रावणसरी, पानाफुलांनी हिरवाळी घेऊन नटलेली धरती, भरपूर चारा-पाणी मिळाल्यानं समृद्ध झालेला गाईगुरांचा गोठा, गावशिवारातल्या कुठल्याही भागात भरपूर गवत असल्यानं गुरांच्या मागं बासरीची धून काढत फिरणारे गुराखी. औत काढत रमलेला शेतकरी, गावच्या पाटलाच्या माडीवर लावलेला श्रावणातला ग्रंथ आणि त्या ग्रंथाच्या पोथीचे सामुहिक वाचन. त्याचबरोबर गावात रंगलेला कृष्णाष्टमीचा हरिनाम सप्ताह. त्या सप्ताहातील कीर्तने, भजने, भारुडे. घराघरातली व्रतवैकल्यं आणि त्या व्रतवैकल्यांचं रूप मांडणाऱ्या कहाण्या.

हे सारं अनुभवलं की, श्रावणाचं वैभव काय असतं हे वेगळं सांगायलाच नको. आजी अंगणात नाहीतर देवळाच्या सभामंडपात बसून श्रावणात कहाण्या सांगायची... धरित्रीची, आदित्यराणुबाईची, सोमवारची, खुलभर दुधाची, सोमवारच्या शिवामुठीची, नागपंचमीची, मंगळागौरीची, शुक्रवारची कहाणी. ह्या साऱ्या कहाण्या म्हणजे शब्दलालित्यानं भरलेलं श्रावणाचं एक समृद्ध वाङ्मयीन दालन. निसर्गानं शोभिवंत झालेला 'श्रावण' कहाणीतून अधिक जिवंत होतो. 'आटपाट नगर होतं' अशी सुरुवात झालेली 'साठा उत्तराची कहाणी' शब्द, विचार आणि तत्त्वबोधानं प्रवाहित होऊन, सहज वाहणाऱ्या झऱ्याप्रमाणे स्वाभाविकपणे वाहात वाहात 'पाचाउत्तरी सुफल संपूर्ण' व्हायची. कहाणी ही सोपी भाषा, आशयपूर्ण, गद्य कवितेसारखी लयबद्ध आणि लौकिक लोकजीवनातील कथा-व्यथेला तत्त्वबोधाचा अलौकिक स्पर्श देणारी आहे.

अशीच एक श्रावणातल्या सोमवारची- **खुलभर दुधाची कहाणी**. आजी सांगत होती. सारी नातवंडे कान देऊन ऐकत होती.

ऐका सोमवारा... तुमची कहाणी. आटपाट नगर होतं. तिथं एक मोठा शिवभक्त राजा राहात होता. त्याच्या मनात आलं, आपल्या महादेवाचा गाभारा दुधानं भरावा. पण हे कसं घडेल? याबद्दल त्याला चिंता पडली. प्रधानानं युक्ती सांगितली. दवंडी पिटली. गावातल्या सर्व माणसांनी आपल्या घरचं सगळं दूध घेऊन दर सोमवारी महादेवाच्या देवळी पूजेला यावं.

राजाची आज्ञा. सर्व माणसांनी घाबरून घरात दूध

ठेवलं नाही. वासरांना पाजलं नाही. मुलाबाळांना दिलं नाही. सगळं दूध देवळात नेलं. साऱ्या गावचं दूध गाभाऱ्यात पडलं. पण देवाचा गाभारा भरला नाही.

एका म्हातारीनं दवंडी ऐकली. शांतपणे विचार केला. घरचं सारं कामकाज आटोपलं. लेकी सुनांना न्हाऊ घातलं. मुलाबाळांना खाऊ घातलं. वासरांना भरपूर दूध पाजलं. गुराढोरांना चारा घातला. त्यांचा आत्मा शांत झाला आणि मग सारं आटपून गंध, फुलं, अक्षता, बेल आणि खुलभर दूध घेऊन देवळात आली. मनोभावे पूजा केली. थोडं दूध नैवेद्याला ठेवलं. देवाची प्रार्थना केली. 'जय शंभो महादेवा, राजानं साऱ्या गावचं पुष्कळ दूध तुझ्या गाभाऱ्यात घातलं; पण गाभारा काही भरला नाही, तो माझ्या खुलभर दुधानं काय भरणार? पण मी हे दूध भक्तिभावानं अर्पण करते.' असं म्हणून राहिलेलं दूध गाभारी अर्पण केलं आणि घरी निघाली.

इकडे चमत्कार झाला. म्हातारी परतल्यावर गाभारा दुधानं भरून गेला. हे गुरवानं पाहिलं. राजाला कळवलं; पण काही केल्या पत्ता लागेना. दुसऱ्या सोमवारी राजानं शिपाई देवळात बसवले. तरीही शोध लागला नाही. तिसऱ्या सोमवारी राजा स्वत: बसला. म्हातारी आली आणि तिच्या खुलभर दुधानं गाभारा भरला. हे राजाला समजलं. राजानं म्हातारीला कारण विचारलं. राजानं अभय देताच तिनं कारण सांगितलं. ''राजा तुझ्या आज्ञेनं काय झालं, वासरांच्या तोंडचं दूध पळालं. पोराबाळांच्या तोंडचं दूध पळालं. त्यांचे आत्मे तळमळले. नाईलाज म्हणून मोठ्या माणसांनी दूध आणलं; पण त्यांचंही मन कुठंतरी कळवळलं. हे देवाला आवडलं नाही. म्हणून गाभारा भरला नाही. ''यावर युक्ती काय करावी?'' राजानं विचारलं. ''मुला-वासरांना दूध पाजावं. घरातील सर्वांना संतुष्ट करावं घरोघरी सगळ्यांनी आनंद घ्यावा. आणि सर्व संतुष्ट झाल्यानंतर उरलेलं दूध देवाला घेऊन यावं. मनोभावे त्याला नैवेद्य अर्पण करावा. म्हणजे देवाचा गाभारा भरेल. देव संतुष्ट होईल.'' राजानं तशी गावात दवंटी पिटवली. चौथ्या सोमवारी राजानं स्वत: पूजा केली. मुलाबाळांना, गायी-वासरांना ठेवून उरलेलं दूध देवाला वाहिलं. हात जोडून प्रार्थना केली. डोळे उघडून पाहातात, तो देवाचा गाभारा भरून गेला. राजाला आनंद झाला. म्हातारीला इनाम दिलं. लेकी सुनांना घेऊन म्हातारी मोठ्या सुखा- समाधानानं नांदू लागली. तसं तुम्ही आम्ही नांदू. ही साठा उत्तराची कहाणी पाचाउत्तरी सुफळ संपूर्ण...

कहाणी संपली, तरी अजून अजून... ऐकत राहावं असं वाटत होतं. पुढं काय घडणार याचं कुतूहल, विस्मय, आनंद... गाभारा दुधानं भरला आणि साऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद खुलू लागला. एका छोट्याशा कहाणीतून भ तीचं केवढं मोठं तत्त्व उभं राहिलं. जेव्हा

धारा सरारा, सरारा, हळू झुळुक वाऱ्याची। टपटपे थेंब थेंब, जणू फुले ती पाऱ्याची।।

स्मरण क्रांतिवीरांचे : शंकर महाले – महाराष्ट्र – भारत छोडो आंदोलनात सहभाग, पोलीस चौकीवर हल्ला.

प्रायोजक - सौ. प्राची अमर परांजपे, सांगली.

मुला वासरांचं दूध पळवलं तेव्हा गाभारा भरला नाही; पण जेव्हा सारे संतुष्ट झाले, तृप्त झाले तेव्हा खुलभर दुधानेही गाभारा भरला. **सर्वांचे समाधान, सर्वांची तृप्ती, सर्वांचा आनंद हाच देवाचा परिपूर्ण गाभारा.** दुसऱ्यांना त्रास देऊन देव मिळणार कसा? **आपल्या वाट्याला आलेली कर्मे प्रामाणिकपणे करावीत. सर्वांना संतुष्ट करावे. आणि जे उरेल ते मनोभावे देवाला अर्पण करावे.** इतरांच्या तोंडचे ओरबाडून देवाला वाहाणे, ही पूजा नाही. काही माणसे देवपूजेचेही अवडंबर माजवितात. त्याची भव्य दिव्यता आणि दिखाऊपणा यांचं प्रदर्शन करण्यासाठी इतरांना लुबाडतात. ही पूजेतील दांभिकता असते. देवाला ही दांभिकता आवडत नाही. सर्वांच्या समाधानाची तृप्ती त्या खुलभर दुधातून व्य त होते. आणि त्या तृप्तीनेच देवही संतुष्ट होतो. देवपूजेचा आणि कर्तव्यधर्माचा केवढा मोठा अर्थ एक कहाणी सांगून जाते.

'कहाणी' हे मराठीतील एक प्रासादिक आणि रसाळ दालन आहे. कहाणीची भाषा ओघवती संवादात्मक असते. नीतिबोध मांडताना शब्दांचा अवजडपणा कुठेही डोकावत नाही. ज्या परिसरात कहाणी घडते, तो परिसर डोळ्यांसमोर उभा राहतो. कहाणीतील 'आटपाट नगर' भूगोलाच्या पुस्तकात कुठे दिसणार नाही. ते कहाणीतील गाव आहे. खरं तर मानवी जीवनातील प्रत्येक प्रसंग ही एक कहाणीच असते. आणि ती ज्या ठिकाणी घडते ते म्हणजे आटपाट नगर होय.

अशीच एक '**शुक्रवारची कहाणी**' आणखी एका आटपाट नगरात घडलेली. ही बहीण–भावाची कहाणी. श्रीमंतीच्या अहंकारात बहिणीला अव्हेरणाऱ्या भावाची कहाणी.

बहीण गरीब असते. तिच्याच गावात भाऊ राहात असतो. तो गावाला सहस्रभोजन घालतो. आपल्या गरीब बहिणीची त्याला लाज वाटते. म्हणून तो तिला जेवायला बोलवत नाही. भावाच्या घरी जायला कसलं आमंत्रण, म्हणून ती विनाआमंत्रणाचीच जाते आणि भाऊ तिला हात धरून हाकलून देतो. ती खूप दुःखी कष्टी होते. पुढे दिवस बदलतात. बहिणीला श्रीमंती प्राप्त होते. भाऊ तिला जेवायला बोलावतो. ती दागदागिने आणि भरजरी वस्त्रे नेसून भावाकडे जाते. पक्वान्नानं भरलेलं ताट भाऊ पुढे ठेवतो. ती सगळे दागिने काढून पाटावर ठेवते आणि अन्नाचा एक एक घास त्या दागिन्यांवर ठेवून दागदागिन्यांनाच भरवते. भाऊ म्हणतो, ''ताई तू काय करते आहेस?'' त्यावर ती म्हणते, ''दादा मी जे करते; ते बरोबर आहे. तू जिला जेवायला बोलावलंस तिलाच मी भरवते आहे. हे माझं जेवण नाही. हे त्या लक्ष्मीचं जेवण आहे. माझं जेवण होतं ते मी सहस्रभोजनाच्या दिवशीच जेवले.'' हे ऐकून भाऊ खजील होतो. बहिणीचे पाय धरून अपराधाची क्षमा मागतो. मोठ्या मनानं भावाला बहीणदेखील क्षमा करते.

कहाणी वाचताना मानवी मनाची, स्वभावाची एवढी सुंदर गुंफण आंतरिक भावनेला आर्ततेनं हाक देते. बहीण–भावाचं निर्व्याज प्रेम महत्त्वाचं. ते बाह्य श्रीमंतीवर अवलंबून नसतं. त्या श्रीमंतीचा अहंकार कुठेतरी बहीण–भावाच्या नात्यात दुरावा निर्माण करतो.

आपल्या अवतीभोवतीची माणसं आपल्याला त्या कहाणीत दिसतात. आणि ती कहाणी आपल्याला खूप जवळची कहाणी वाटू लागते.

केवळ व्रतवैकल्ये सांगणारी गोष्ट म्हणून कहाणीकडे न पाहाता मानवी मूल्यांची बोधकथा म्हणून तिचे स्थान वेगळेच आहे. कहाणीतून सहजपणे व्य त होणारा हा बोध समाजदर्शन, भावदर्शन आणि तत्त्वदर्शन उभे करतो. कुटुंबव्यवस्था सांभाळणारी, जगण्यातली मूल्ये सांगणारी, जीवनातले आदर्श मांडणारी; सहजतेने सारस्वताला खुलविणारी 'कहाणी' लोकजीवनातून हरवायला नको, हे खरं...

***

– डॉ. रामचंद्र देखणे
सी ३–४ डी. एस. के. चिंतामणी,
५१३ शनिवार पेठ, पुणे 411030

सुरांना सुंदर साज हवा, आत्म्याचा विश्वास हवा। स्वर्गभूवरी उतरवण्या, मायेचा अनुबंध हवा।।

स्मरण क्रांतिवीरांचे : अच्युत पटवर्धन – महाराष्ट्र –सविनय कायदेभंग व भारत छोडो चळवळीत सहभाग.

दहावी–बारावी, कलचाचणी, पदवीपूर्व/पदव्युत्तर करिअर समुपदेशन – प्र. मा. संशोधिका , ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१४४



अन्यायाचा जिथे तडाखा, विरोध माझा ठाम तिथे। फुलविन फुले मी आनंदाची, बन काटेरी असे जिथे !

स्मरण क्रांतिवीरांचे : भुलाभाई देसाई – गुजरात – बारडोली सत्याग्रहात शेतकऱ्यांचे वकील, 'स्वदेशी सभा' स्थापना.

सहभागी व्हा ! मुलींसाठी - क्रीडा दले, विज्ञान दल - युवती विभाग, ज्ञान प्रबोधिनी, पुणे - मेधाविनी ☎ ९४२३१६२१३४

संवाद कौशल्य

लेखांक - १३

संवादात देहबोलीचे महत्त्व - भाग २

– स्वप्नीला सेठिया

छात्र प्रबोधनच्या सौर ज्येष्ठ/जून २०१४ च्या अंकात 'देहबोली'याविषयी आपण प्राथमिक तांत्रिक माहिती मिळवली. परिणामकारक संवाद साधण्यासाठी निरीक्षणातून स्वत:ची देहबोली कशी विकसित कराल, हे या लेखातून सोदाहरण जाणून घ्या.

सत्यजित शाळेतून घरी आला. दार उघडताक्षणीच आईच्या लक्षात आलं, की आज स्वारीचं काहीतरी बिनसलं आहे. चेहरा रडका, हास्य गायब, कपाळावर आठ्या. न बोलता सत्यजित खोलीत गेला. बॅग ठेवली. कपाटातले कपडे काढले, घातले आणि निमूट जेवायला आला. आई सगळं बघत होती. तिनं हळूच सत्यजितच्या ताटात त्याचा आवडता बेसनाचा लाडू ठेवला. क्षणात सत्यजितचे डोळे हसले आणि शाळेत घडलेला प्रसंग तो आईला सांगायला लागला...

वरील प्रसंग तुमच्याही सर्वांच्या बाबतीत कधीतरी घडलेला असेल. वरच्या प्रसंगात तुमच्या लक्षात आलं असेल, की आई आणि सत्यजित यांच्यात कोठेही शब्दांचा संवाद झालाच नाही; पण तरीही सत्यजितचं काहीतरी बिनसलंय हे आईच्या लक्षात आलं. हा 'शब्देविण संवाद' घडला **देहबोलीमुळे**. देहबोली म्हणजे देहाची भाषा, शरीराची भाषा. ही भाषा आपल्या संवादामध्ये जिवंतपणा आणते. तुमच्या डोळ्यांसमोर तुम्ही खालील दृष्य आणून बघा बरं...

एक माणूस तुमच्याशी बोलतोय; पण त्याच्या चेहऱ्यावर कसलेच भाव नाहीत. डोळे शून्यात बघतायत. हात, डोके शरीर स्थिर अगदी लाकडासारखे !

अशा माणसाशी बोलण्याऐवजी तुम्ही उठून जाल आणि जर तुम्हाला तिथे बसून राहायची सक्ती केली, तर तो काय बोलतोय त्यातील अर्धा भागही तुम्हाला कळणार नाही.

'आपला संवाद परिणामकारक व्हावा' असे तुम्हाला वाटत असेल, तर भाषेच्या बरोबरीनं तुम्ही आपल्या देहबोलीवरही काम करायला हवे. आज जरी तुम्ही शाळेत असलात तरी काही वर्षांनी कॉलेजमध्ये प्रवेश घ्याल, एखाद्या व्यावसायिक अभ्यासक्रमाला जाल, त्यानंतर एखाद्या मोठ्या हुद्द्यावर काम करणारे व्हाल. प्रत्येक ठिकाणी तुमचे संवाद कौशल्य व संवादाची परिणामकारकता अवश्य बघितली जाईल. काही व्यवसाय तर मुळातच संवाद व देहबोलीच्या कौशल्यावर आधारित असतात. त्यासाठी सर्वात प्रथम असे कोणते व्यवसाय आहेत, याची तुम्ही यादी करा पाहू. (उदा. 'वकिली' हा व्यवसाय पूर्णपणे संवाद व देहबोलीवर आधारित आहे.) अशा वेगवेगळ्या व्यवसायांची यादी तुम्ही केल्यावर, अशाप्रकारचे व्यवसाय करत असलेल्या तुमच्या ओळखीच्या किमान दोन व्य तींना भेटा. त्या व्य ती काम करताना त्या व्य तींचे तुम्ही निरीक्षण करा. त्यांच्या देहबोलीचे काय विशेष तुम्हाला जाणवतात ते नोंदवून ठेवा.

हे निरीक्षण करताना तुम्हाला देहबोलीमध्ये कशाकशाचा अंतर्भाव होतो? हे लक्षात येतं का ते बघा. त्यासाठी तुम्ही खालील काही मुद्द्यांचा वापर करा.

१. त्या व्य तीची शरीर-स्थिती (Posture) कशी आहे?
२. बोलताना ती व्य ती डोकं कसं हालवते?
३. तिच्या चेहऱ्यावर काय भाव असतात?
४. तिच्या हातांचा वापर ती कसा करते? ती व्य ती फार हातवारे करत बोलते, की हातांचा मर्यादित वापर करते?
५. तिच्या डोळ्यांच्या हालचाली कशा असतात? ती

पाऊस सवंगडी होता, किती खेळ खेळलो आम्ही। बोट पकडूनी त्याचे, किती दूर धावले मी ।।

स्मरण क्रांतिवीरांचे : लाला जयदयाल भटनागर - राजस्थान - इ. स.१८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यात सहभागी.

नागरीवस्त्यांमधील किशोरींसाठी उपक्रम - नागरीवस्ती अभ्यासगट, ज्ञान प्रबोधिनी, पुणे - हर्षाताई ☏ ९३२५२७२३३७

व्य ती नजरेला नजर मिळवत बोलते, की दुसऱ्याची नजर टाळून बोलते?

यांबाबत निरीक्षण करताना तुमच्या लक्षात येईल, की योग्य देहबोलीमुळे समोरच्या व्य तीच्या संवादातील अर्थपूर्णता वाढते. परस्पर संवाद चांगला होतो.

बऱ्याचदा आपल्याला या देहबोलीचं महत्त्व फारसं माहीत नसतं. त्यामुळे काही चुकीचे संकेत आपल्याकडून दिले जातात. उदा. बोलताना बऱ्याचजणांना खाली बघत, इकडेतिकडे बघत बोलायची सवय असते. तर काहींना बोलताना सतत या पायावरून त्या पायावर हालण्याची सवय असते. अशा काही सवयींमुळे समोरच्या व्य तीचा तुमच्याबद्दल गैरसमज होऊ शकतो. तुम्ही चंचल आहात, तुमच्यात आत्मविश्वासाची कमतरता आहे असं वाटू शकतं. म्हणजेच देहबोलीमुळे संवाद जसा अर्थपूर्ण होतो त्याबरोबरच व्य तीचं व्य तिमत्त्वही उठून दिसतं. देहबोली योग्य तर व्य तिमत्त्व उठावदार. पण तीच देहबोली अयोग्य असेल तर व्य तिमत्त्वातील न्यूनता अधिक ठळक होऊ शकते. अशा अयोग्य देहबोलीचे संकेतही समजून घ्यायला हवेत.

त्यासाठी तुम्ही खालील प्रयोग करून बघा पाहू. *तुम्हाला आवडणारी कोणतीही एखादी फिल्म-कार्टुनही चालेल, ती लावा आणि आता तिचा आवाज बंद (Mute) करा. आता तुम्ही त्यातील पात्रांचे निरीक्षण करा. पात्रांच्या हालचाली, त्यांची देहबोली यावरून त्या पात्रांची कोणती स्वभाव वैशिष्ट्ये तुम्हाला जाणवतात, ते नोंदवा.*

उदा. *आईस एज* हा सिनेमा बघताना त्यातल्या प्राण्यांची व्य तिरेखा निव्वळ उत्तम देहबोलीद्वारे वेगवेगळ्या मानवी भावना कशा दर्शवतात, हे बघायला तुम्हाला मजा वाटेल. त्यातूनच योग्य व अयोग्य देहबोलीचे संकेतही तुम्हाला समजून घेता येतील.

देहबोलीतील अजून एक महत्त्वाचा भाग म्हणजे आपण नकळतपणे पाळत असतो ते **शिष्टाचार**.

संवादातील शिष्टाचार म्हणजे -

१. समोरच्या व्य तीशी बोलताना राखायचे अंतर

२. अभिवादनाचा प्रकार. उदा. हस्तांदोलन/ नमस्कार

शिष्टाचारांचं पालन करताना आपण देहबोलीचाच वापर बऱ्याचदा करत असतो.

उदा. भारतीय संस्कृतीमध्ये माणसं एकमेकांना भेटल्यावर नमस्कार करतात किंवा आपल्यापेक्षा मोठ्या व्य तीच्या पाया पडतात. त्यातून आपण एकमेकांप्रति आदरभावना दर्शवत असतो. प्रत्येक देशाच्या संस्कृतीप्रमाणे तेथील शिष्टाचारात फरक पडतो. उदा. युरोपमधील अनेक देशात दोन व्य ती अनौपचारिकरित्या भेटताना समोरच्या गालाला गाल भिडवून चुंबन घेतात. यात त्यांना काही विचित्र वाटत नाही. पण हा शिष्टाचार आपल्या देशात पाळला तर आपल्या संस्कृतीमध्ये ते बसत नाही. म्हणजे देहबोलीचे शिष्टाचार हा विचार करून पाळायचा भाग आहे.

समोरच्या व्य तीबरोबर बोलताना आपल्यामध्ये किती अंतर ठेवायचे, हे देखील देहबोली व शिष्टाचाराचाच एक भाग आहे. यासाठी खालील उदाहरण बघूया.

प्रसंग* - १. *दोन व्यक्ती एकमेकांपासून चार फूटांवर उभ्या आहेत व एकमेकांशी बोलत आहेत.

२. दोन व्यक्ती एकमेकांपासून फूटभर अंतरावर उभ्या आहेत व त्या हातात हात घेऊन बोलत आहेत.

३. दोन व्यक्ती अगदी एकमेकांच्या जवळ उभ्या आहेत आणि खांद्यावर हात ठेवून बोलत आहेत.

वरील प्रत्येक प्रसंगातील व्य तींचे नाते व त्यांच्यातील संवाद कोणत्या प्रकारचा असेल याचा तुम्ही अंदाज करा पाहू. उदा. जेव्हा दोन व्य ती बोलताना ४ फूट अंतर ठेवून बोलतात तेव्हा बऱ्याचवेळा ते नाते वरिष्ठ-कनिष्ठ असू शकते. किंवा ते नाते खूप औपचारिक असते. त्याप्रमाणे पुढील दोन प्रसंगाबाबत विचार करा पाहू...

देहबोली ही आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. नकळतपणे आपण ती वापरतो. पण जर अधिक सजगपणे तिचा उपयोग केला तर आपल्याला फायदाच हाईल. 'संवाद साधणे' जसे शिकता येते तसेच 'देहबोली'चा योग्य उपयोग कसा करायचा हेही शिकता येते. त्यासाठी खूप महागडे, व्य तिमत्त्व विकासाचे कोर्स करायची गरज नाही. खाली काही छोट्या व सोप्या गोष्टी दिल्या आहेत. त्या आवर्जून करा आणि आपली देहबोली विकसित करण्याचा प्रयत्न करा.

काल मी स्वप्नात माझ्या, एक गाव पाहिला। माणुसकीचा धर्म, ज्या मातीमध्ये अंकुरला।।

स्मरण क्रांतिवीरांचे : सरदार उधमसिंग - पंजाब - जालीयनवाला बाग हत्याकांडाला जबाबदार, अधिकारी ओडवायरची हत्या.

कालोचित, अर्थपूर्ण संस्कारांसाठी - पौरोहित्य विभाग, संत्रिका, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१४७

उदा. १. तुमच्या आजूबाजूला उत्तम संवाद साधणाऱ्या व्य तींचा सतत शोध घ्या. बोलताना त्या व्य तींच्या देहबोलीचे निरीक्षण करा.

२. बोलताना तुम्ही स्वत: हातवारे कसे करता? तुमच्या चेहऱ्यावरचे हावभाव कसे असतात, त्याचे मोबाइलवर किंवा कॅमेऱ्याद्वारे शूटींग करा. ते शूटींग पाहून तुमच्या देहबोलीतले सकारात्मक, नकारात्मक मुद्दे नोंदवा.

३. जिथे संधी मिळेल तिथे संवाद साधा. विशेषत: सार्वजनिक ठिकाणी. त्यामुळे आपल्याला आपली देहबोली वापरण्याचा सराव होतो व चुका शोधायची संधीही मिळते.

४. विविध प्रसंगांमध्ये आवश्यक असणारे व वापरले जाणारे शिष्टाचार कोणते याची यादी करा. त्यातले कोणते शिष्टाचार तुमच्या देहबोलीतून परिणामकारकरित्या पाळता येतील, याचा विचार करा. श य झाल्यास दैनंदिन जीवनात त्यांचा उपयोग करा.

५. चार-पाच जणांचा गट करून एकावेळी दोन व्य तीं (वये/नाती तुम्हीच ठरवा) मधील एखादा प्रसंग सादर करायचा (मूक अथवा संवादासह) आणि उरलेल्यांनी त्या प्रसंगाला अनुरूप देहबोली होती का याबाबत निरीक्षणे नोंदवून नंतर ती सांगायची.

वरील गोष्टी सातत्याने करत राहिलात तर देहबोलीचा परिणामकारक वापर तुम्ही करू शकाल, याचा विश्वास वाटतो. त्यासाठी तुम्हाला खूप खूप शुभेच्छा !

***

- स्वप्नीला सेठिया
१०३ ऑरेंज सृष्टी, फेज १,२६९/२ ब,
बावधन बुद्रुक, पुणे 411021

गणपतीसाठी आकर्षक सजावट



१. रंगीत जाळी -

आपण बहुतेकवेळा गणपती बसविताना, मागच्या बाजूला रंगीत कापडाचा उपयोग करून पडदा बनवितो. यावेळी रंगीत कागदाचा उपयोग करून, गणपतीच्या मागे रंगीत जाळी कशी बनविता येते ते पाहूयात.

प्रथम २० सें.मी. १२ सें.मी. आकाराचा घोटीव कागदाचा कोणत्याही रंगाचा चौकोनी तुकडा घ्या. आकृतीत दाखविल्याप्रमाणे त्याच्या घड्या घाला. आता आकृती ३ 'अ' वर पेन्सिलच्या साहाय्याने तुम्हाला हवी तशी नक्षी काढून घ्या. आ. ३ 'ब' च्या घडीवर दाखविल्याप्रमाणे कात्रीच्या साहाय्याने रेषांनी भरलेला भाग कापून घ्या. कागद उघडून पाहा. सर्व चौरसावर जाळीदार नक्षीकाम तयार झालेले दिसेल.

हे नक्षीकाम सरावाने सफाईदार करता येते. त्यासाठी अंतिम नक्षीकाम करण्याआधी तुम्ही घरच्या घरी सरावही करू शकता. या प्रकारचे नक्षीकाम दोन रंगाचे कागद वापरून करा. फेव्हिकॉलच्या साहाय्याने दोन्ही रंगांचे चौकोन एकाआड एक चिकटवून आवश्यक तेवढ्या आकाराची जाळी बनवा.

२. सुंदर पताका



गणपतीची आरास करताना पताका या हव्यातच. यासाठी लागणार आहे, पतंगासाठी जो कागद वापरतात तसा रंगीत कागद, सुतळी, फेव्हिकॉल, कात्री वगैरे. पतंगाच्या कागदाचा २० सें.मी. १२ सें.मी. च्या आकाराचा रंगीत तुकडा घ्या. त्याची बरोबर मध्ये घडी घाला. वरील आकृतीमध्ये दाखविल्याप्रमाणे पेन्सिलने अर्ध्या पानाच्या आकाराची आकृती काढून घ्या. रेघांनी दाखविलेला भाग कापून घ्या. आता आकृती ३ मध्ये दाखविल्याप्रमाणे पेन्सिलने घडीवर वेगवेगळे आकार काढून घ्या. कात्रीच्या साहाय्याने हे आकार कापून घ्या. अशाप्रकारे पानाव्यतिरि त वेगवेगळे आकार बनवून घ्या. झाल्या रंगीबेरंगी छान पताका तयार! ३ ते ४ मीटर लांब सुतळीवर हे तुकडे फेव्हिकॉलने लावून घ्या व छान सजावटीबद्दल सगळ्यांकडून शाबासकीसुद्धा मिळवा!

- मेधा सुदुंबरेकर
२६, मित्रमंडळ कॉलनी, पर्वती, पुणे 411009

(पूर्वप्रसिद्धी - सौर श्रावण, शके १९२३/ऑगस्ट २००१)

पावसाने जावे तेथे, जेथे माणसांचा गाव। ज्याला ठावूक संस्कृती, त्याचे माणूस रे नाव।।

स्मरण क्रांतिवीरांचे : सोहनलाल पाठक - पंजाब - पूर्व भागातील लष्करी छावण्यात सशस्त्र उठावासाठी आवाहन.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी 'लिडरशीप प्रिपरेटरी व फाऊंडेशन कोर्स' - नेतृत्व संवर्धन केंद्र, ज्ञान प्रबोधिनी ☎ २४२०७१७४

छात्र प्रबोधन दिवाळी अंक २०१४-प्रकाशनपूर्व नोंदणीसाठी आवाहन

प्रिय प्रबोधक,

'छात्र प्रबोधन'च्या दिवाळी अंकाची तुम्ही आणि सारा महाराष्ट्र आतुरतेनं वाट बघत असतो. मागील वर्षी मराठी दिवाळी अंकाला महाराष्ट्र साहित्य परिषद' पुणे व जुळे सोलापूर यांचे विशेष पुरस्कार मिळाले आहेत. अत्यंत दर्जेदार असा आपला यावर्षीचा दिवाळी अंक तयार होतो आहे. कोणतेही कमिशन न घेता, स्वयंसेवी वृत्तीने महाराष्ट्र व गोव्यात गावोगावचे कार्यकर्ते अत्यंत मन:पूर्वक आपल्यापर्यंत हा अंक पोहोचावा म्हणून काम करीत असतात.

खालील शहरांत/गावांत छात्र प्रबोधनच्या दिवाळी अंकांच्या नोंदणी व वितरणाचे काम करणारे काका–काकू किंवा ताई–दादा आहेत. **त्यांच्याकडे जाऊन तुम्ही तुमचा दिवाळी अंक १५ ऑ टोबरनंतर घेऊन जावा.** यावर्षी दिवाळी अंकाच्या जास्तीत जास्त नोंदणीसाठी तुम्हीही त्यांच्याबरोबर सहभागी होणार ना? छात्र प्रबोधनचा दिवाळी अंक आपल्या अनेक मित्र–मैत्रिणींना सवलतीच्या दरात नोंदवायला सांगा. तसेच इतरही अंकांची नोंदणी तुमच्यासाठी व तुमच्या परिचयातल्या व्य तींसाठी आवर्जून करा. १० ऑगस्टपर्यंत दिवाळी अंकाचे प्रचार साहित्य खालील केंद्रांवर उपलब्ध असेल. तुम्ही त्याचाही उपयोग करून तुमच्या शाळेत व परिसरात नोंदणी करू शकता. प्रकाशनपूर्व नोंदणीचा अंतिम दिनांक **१५ सप्टेंबर २०१४.**

तसेच छात्र प्रबोधनद्वारा प्रकाशित पुस्तकांचीही नोंदणी खालील केंद्रांवर करा. (सूची मलपृष्ठाच्या आतील पानावर दिली आहे.)

ज्या गावांमध्ये वितरण केंद्रे नाहीत, त्या गावांमधील सभासदांना साध्या पोस्टाने अंक पाठविले जातील. अंक न मिळाल्यास वेगळा अंक पाठवला जाणार नाही. खात्रीशिरपणे दिवाळी अंक मिळण्यासाठी **रु. ४०/–** जादा पाठवावेत. त्या सर्वांना कुरिअर/रजिस्टर्ड पोस्टाने अंक पाठवले जातील.

– संपादक, छात्र प्रबोधन

– दिवाळी विशेषांकांची प्रकाशनपूर्व नोंदणी किंमत –

नित्य मासिकाचा दिवाळी अंक	इंग्रजी	ग्रामीण	युवोन्मेष	बोलका अंक	चारही अंकांचा एकत्रित
₹ ४०	₹ ४०	₹ ३०	₹ ४०	सी.डी. ₹ ५०	संगणकीय (Pdf) अंक सी.डी. ₹ ५०

प्रकाशनपूर्व सवलतीतील नोंदणीचा अंतिम दिनांक १५ सप्टेंबर २०१४

छात्र प्रबोधन दिवाळी अंक वितरण व नोंदणी केंद्रे

विभाग १. बोरीवली (प. मुंबई)

बोरीवली	- सौ. सुमिता पांढरे	☎ ९९६९०५१५७३
विलेपार्ले	- श्री. दत्तात्रय जोशी	☎ ९८६९०६३७७२
बांद्रा	- श्री. मिलिंद चिंदरकर	☎ ९३२२२४२५६९
गिरगाव	- श्रीमती शिरीषा खरे	☎ २२-२३८८६९३५
चेंबूर	- कु. मधुरा पंडित	☎ ९८६९४५०००१
विरार-वसई	- श्री. फ्रान्सिस डिमेलो	☎ ९८५०१८२६६१
पालघर	- श्री. तुषार राऊत	☎ ९८६०२०३१००
दादर	- श्री. सतीश पै	☎ ९८२०२६७३२७

विभाग २. डोंबिवली (मध्य मुंबई, ठाणे)

ठाणे	- सौ. सुप्रिया बर्वे	☎ ९८६९११५०४१
डोंबिवली	- सौ. ज्योती कर्वे	☎ ९९६९६१५८४७
कल्याण	- सौ. स्मिता मनोरे	☎ ९९२०९४८७७८
अंबरनाथ	- सौ. अश्विनी कुलकर्णी	☎ २५१-२६०१४११
बदलापूर	- श्री. चिंतामणी उगले	☎ ९४२३०८९७७४

विभाग ३. अलिबाग (रायगड, नवी मुंबई)

अलिबाग	- श्री.राम जोशी	☎ ९४२०८३५६५०
नागाव	- सौ. स्नेहा जोशी	☎ २१४१-२४५६६१

माझ्या श्वासात दाटावे, गंध फुला फुलातले। घ्यावे ओठांनी चुंबून, दव पहाटेचे ओले।।

स्मरण क्रांतिवीरांचे : कर्तारसिंग – पंजाब – ब्लॅकबीलच्या विरोधात निदर्शने

NTS मार्गदर्शन, विविध कौशल्यांचे प्रशिक्षण - बुद्धिमत्ता संवर्धन केंद्र, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१९४

नागोठणे - सौ. सुलभा गोखले ☎ २१९४-२७७९०३
मुरुड - सौ. दीपाली जोशी ☎ ९९६०८६६१७७
महाड - श्री. डी. एस्. सावंत ☎ ९८२२६२६९३२
रसायनी - सौ.शुभदा कोकीळ ☎ ९८८१९०३६७३
वाशी - सौ. विजयालक्ष्मी पाटगावकर ☎ २२-२७८०१९६८

विभाग ४. रत्नागिरी (रत्नागिरी, सिंधुदुर्ग)

रत्नागिरी - सौ. प्रतिभा प्रभुदेसाई ☎ २३५२-२२२९५३
पावस - सौ. शीतल सामंत ☎ ९४२११३९५३०
चिपळूण - श्री. प्रसाद काणे ☎ ९४२२४३०९००
राजापूर - श्री. संजय कुलकर्णी ☎ ९४२११२२९७५७
खेड - सौ. नम्रता दामले ☎ ९४२२४३३९४९
सावंतवाडी - सौ. वंदना करंबेळकर ☎ ९८५०४७३०१२
कणकवली - श्री. औदुंबर भागवत ☎ ९४२११४७५१३
लांजा - डॉ. अशोक शहाणे ☎ ९४२११८९२४७

विभाग ५. फोंडा (गोवा)

फोंडा - श्री. मोहन आमशेकर ☎ ९४२२०५८८७३
मार्दोळ - श्री. शिरीष आमशेकर ☎ ९४२११५८९२२
वास्को - सौ. दीपा गावकर ☎ ९९२१८९७०९६
परवरी - श्री. वल्लभ केळकर ☎ ९४२०८१८४८३
म्हापसा - श्री. प्रशांत बर्वे ☎ ९४२२४५६५५५

विभाग ६. इचलकरंजी (कोल्हापूर)

इचलकरंजी - श्री.विनायक गद्रे ☎ ९८८१५९००१८
हुपरी - सौ. सुधा सांगवडेकर ☎ ९०२८८५२०५२
महागाव - श्री. सुभाष सुतार ☎ ९०९६७१२८१३

विभाग ७. सांगली

सांगली - श्री. शैलेंद्र केळकर ☎ ९४२२६१६०५८
तासगाव - श्री. प्रसाद हसबनीस ☎ ९४२३८१०४०९
३२ शिराळे - श्री. नाथाराव हसबनीस ☎ ९७६७६८०७०१
कडेगाव - डॉ. मकरंद बर्वे ☎ ९९२२२१२९०३
इस्लामपूर - सौ. स्वाती कुलकर्णी ☎ ९४०४३५९२६२
मिरज - श्री. श्रीकांत कुलकर्णी ☎ ९३७२२२३४८५

विभाग ८. सातारा

सातारा - श्री. सतीश कुलकर्णी ☎ ९४२३२६०२६०
कोरेगाव - डॉ. मिलिंद शहा ☎ ९८२२०२३२०८
कराड - श्री. दत्तात्रय कुलकर्णी ☎ २१६४-२२२५०५
उंब्रज - डॉ. धनंजय कुलकर्णी ☎ ९४०३५४६९१३
खंडाळा - श्री. अरुण फाळके ☎ ९८९०६०९६३१

विभाग ९. सोलापूर

सोलापूर - ज्ञान प्रबोधिनी ☎०२१७-२३१७७८२
पंढरपूर - श्री. दीपक इरकल ☎ ९४२३५६३८९५

विभाग १०. कर्जत (अहमदनगर)

नगर - सौ. स्नेहल धर्माधिकारी ☎ ९४२२०८४६१३
संगमनेर - श्री. अशोक भारंबे ☎ ९९२१६४४२११
कोपरगाव - डॉ. अंजली फडके ☎ ९३२५९५०१२१
शिर्डी - डॉ. प्रबोध जोशी ☎ ९४२१५५८४६६
कर्जत - श्री. गजानन चावरे ☎ ९९६०११८५८६
पारनेर - सौ. सविता रेपाळे ☎ ९९२२२५१६६७
श्रीगोंदा - श्री. महेशकुमार शिंदे ☎ ९९२१२७९४१६

विभाग ११. उत्तर महाराष्ट्र

नाशिक - श्री. अनिल दंडगव्हाळ ☎ ९४२२२४८२६४
मालेगाव - डॉ. रागिणी भेलसेकर ☎ ९५०३२२२३९६
धुळे - श्री. एन. एम. जोशी ☎ ९४२१५००८८२
देऊर बु।। - श्रीमती स्वरूपा देवरे ☎ ७५८८६२८८११
साक्री - श्री. चंद्रकांत पंचभाई ☎ ९४२१५३७५०४
शिरपूर - प्रा. वैशाली पाटील-देवरे ☎ ९८२३२९९९७३
दोंडाईचा - श्री. सुभाष जैन ☎ ९८२३४१६८४४
नंदूरबार - डॉ. वैशाली काणे ☎ ९४२३९८०२९६
शहादा - सौ. सुनीता पटेल ☎ ९४२०२७११०१
जळगाव - श्री. अनिल भोळे ☎ ९४२०६६२७१४
अमळनेर - श्री. दत्तात्रय सोनावणे ☎ ९४२०१११११८२
चोपडा - श्री. सुधाकर केंगे ☎ ९४२३९१५५२९
चाळीसगाव - डॉ. मुकुंद करंबेळकर ☎ ९८२२२६३२७९
भुसावळ - श्री. अनिल जोशी ☎ ९३२६११८०२८

विभाग १२. मराठवाडा

औरंगाबाद - चि. शुभम जोशी ☎ ९४०३६२९१३८
जालना - श्री. विजय देशमुख ☎ ९४२३४५७६५५
बीड - श्री. कैलास लिंगे ☎ ९८८१४५१३५७
अंबाजोगाई - ज्ञान प्रबोधिनी ☎ ९४२१६२२६०९
माजलगाव - श्री. निरंजन वाघमारे ☎ ९८८१८६७१२३
धाराशिव - श्री. बालाजी माळी ☎ ९४०३३९११०६
हराळी - ज्ञान प्रबोधिनी ☎ ८८८८८०२६०४
लातूर - श्री. अमोल होनमाळे ☎ ८१४९९६०५५५
परभणी - श्री. प्रताप देशपांडे ☎ ९४०४९७४६१९
सेलू - श्री. भालचंद्र गांजापूरकर-जोशी ☎ ९४२२८६९५२२
नांदेड - सौ. मीरा तातोडे ☎ ९८८१०९१०५४

विभाग १३. विदर्भ

अकोला - श्री. भूषण बापट ☎ ९८५०३८६४९४
अमरावती - श्री. प्रदीप व्यवहारे ☎ ९८६०६७४७७२

हंड्या झुंबरे थाट नको, नको लावूस अत्तर दिवे। आभाळभर चांदण्या अन् बकुळ फुलांचे झाड हवे।।



स्मरण क्रांतिवीरांचे : मदनलाल धिंग्रा – पंजाब – ब्रिटीश अधिकारी सर कर्झन विलीची हत्या.

७वी ते ९वीच्या मुलामुलींसाठी- सामूहिक विद्याव्रत संस्कार - संत्रिका व संवादिनी, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७२२२

वर्धा - श्री. मंदार देशपांडे ☎ ९४२०४१५६४८
उमरखेड - श्री. धनंजय कुदे ☎ ९४०३४६००४८
चंद्रपूर - श्री. मुकुंद घरोटे ☎ ९०११६३१६५८
वरोरा - श्री. उमेश लाभे ☎ ९४०३२४२७०५

विभाग १४. पुणे

पुणे शहर - छात्र प्रबोधन मुख्य केंद्र ☎ २०-२४२०७१७४
निगडी - ज्ञा.प्र. नवनगर विद्यालय ☎ २०-२७६५४३८०
चिखली - श्री. गौतम इंगळे ☎ ९७३०२३७३८८
साळुंब्रे - ग्राम प्रबोधिनी विद्यालय ☎ २११४-२२३३७१
शिवापूर - श्री. संजीव तागडे ☎ २०-२४३८४०१३
इंदापूर - श्री. तुषार रंजनकर ☎ ९४२२३२९६१६
चाकण - डॉ. अविनाश अरगडे ☎ ९४२३५७१५५२
शिरूर (घोडनदी)-श्री. प्रशांत अवचट ☎ ९८८१०४९४३८
बारामती - सौ. मयुरा कानिटकर ☎ ९४२३५८४३२४
सासवड - सौ. कल्पना खांडेकर ☎ ९४२३२०८१०१
भोर - सौ. शुभांगी मुकादम ☎ ९६२३०९३९६०

अधिकाधिक गावांमध्ये छात्र प्रबोधनची नोंदणी व वितरण केंद्रे व्हावीत यासाठी सभासदांना आवाहन !

महाराष्ट्रातल्या प्रत्येक जिल्ह्यात आणि प्रत्येक तालु यात छात्र प्रबोधनचे दिवाळी अंक नोंदणी व वितरण केंद्र सुरू व्हावे, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोतच. त्याला तुमचीही साथ हवी आहे. तुम्ही स्वत: किंवा तुमच्या परिचितांपैकी कोणी आपल्या गावात छात्र प्रबोधनचे केंद्र सुरू करू शकणार असेल, तर त्यांचे मन:पूर्वक स्वागत आहे. त्यांनी किमान **५० दीपावली अंकांची नोंदणी करावी व मासिकाचे किमान ५ सभासद** करावेत ही अपेक्षा आहे. अर्थातच हे काम स्वयंस्फूर्तपणे, छात्र प्रबोधनवरील प्रेमापोटी आपल्या गावातील अधिकाधिक मुलामुलींपर्यंत दर्जेदार अंक पोहोचावा, या हेतूने करावयाचे आहे. तुम्हाला आवश्यक ते प्राचार साहित्य पाठवले जाईल व दिवाळी अंक आमच्या खर्चाने तुमच्यापर्यंत पाठवले जातील.

प्रतिसादी वाचकवीर व्हा... ४

हा अंक वाचा... प्रश्नांची उत्तरे लिहून पाठवा... आणि बक्षीस मिळवा...

दर महिन्याचा 'छात्र प्रबोधन'चा अंक तुम्ही आवडीने वाचत असालच. छात्र प्रबोधनच्या वासंतिक अंकापासून (चैत्र/एप्रिल) त्या-त्या अंकावर आधारित काही प्रश्न दर महिन्याच्या छात्र प्रबोधनच्या अंकात देत असतो. **या अंकातील प्रश्नांची उत्तरे दि. ३० सप्टेंबर २०१४ पर्यंत** 'छात्र प्रबोधन'कडे पाठवा. बक्षीस जिंकण्याची प्रत्येकाला संधी. या निमित्ताने तुम्ही प्रत्येक अंक बारकाईने वाचाल व अंकातील साहित्याचा अधिक आनंद मिळवाल, असा विश्वास आहे.

१. 'गोविंदाऽऽ रे गोपाळाऽऽ' या लेखात आताच्या दहीहंडीच्या खेळातला आनंद हरपला असे लेखकाला का वाटते?
२. 'साठा उत्तराची कहाणी' या लेखात कहाणी या लोकजीवनातील कथा-साहित्य प्रकाराची कोणती वैशिष्ट्ये लेखकाने सांगितली आहेत?
३. 'संवाद कौशल्य' या लेखात सुचविलेल्या काही निरीक्षणाच्या कृतींपैकी तुम्ही कोणतीही एक कृती करून पाहा आणि तुमचा अनुभव आम्हाला कळवा.
४. 'संग्रामाची पूर्वसंध्या' या लेखात लेखकाने कोणत्या युद्धाच्या वेळचा अनुभव कथन केला आहे?
५. 'सत्कार' या कथेतून प्रेरणा घेऊन तुम्ही कोणते विधायक काम करू इच्छिता? व ते कशाप्रकारे पूर्ण करू इच्छिता?

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर १० श्रावण, शके १९३६, १ ऑगस्ट २०१४ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे -२ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे - ३० येथून प्रसिद्ध केले.

मागील वर्षी 'महाराष्ट्र साहित्य परिषद'-पुणे व सोलापूरतर्फे 'उत्कृष्ट बालकुमार दिवाळी अंक' पुरस्कार प्राप्त. आत्तापर्यंत २० पुरस्कारांनी सन्मानित !!

चाहूल दिवाळीची... अन्
छात्र प्रबोधन दिवाळी अंकांचीही...

सलग तीन वर्षे ५० हजारच्यावर दिवाळी अंकांची प्रकाशनपूर्व नोंदणी होणारे कुमारांसाठीचे एकमेव मासिक !

कथा, कविता, ललित लेख, माहितीपर लेख, खेळ, विज्ञान प्रयोग, प्रेरणादायी लेखमाला यांचा मस्त खजिना या दिवाळीच्या सुट्टीत लुटायचाय ना? त्यासाठी तय्यार ना?

सभासदांना त्यांचा मराठी दिवाळी अंक जवळच्या केंद्रावरून मिळेलच !

छात्र प्रबोधनच्या सर्व दिवाळी अंकांची प्रकाशनपूर्व सवलतीच्या दरातील नोंदणी करायला विसरायचं नाहीये हं !

आजच आपली व आपल्या मित्र-मैत्रिणी, चुलत-मामे-आते -मावस भावंडे यांची नोंदणी प की करा.

प्रकाशनपूर्व सवलतीतील नोंदणीचा अंतिम दिनांक २० सप्टेंबर २०१४

दिवाळी अंकांचे तपशील, वितरण केंद्रप्रमुख, त्यांचे दूरभाष क्रमांक आतील पानावर

१ ऑ टोबरपर्यंत स्थानिक वा मुख्य केंद्रावर पुस्तकांची र कम पाठवा. दिवाळी अंकांसोबत पुस्तके जवळच्या वितरण केंद्रावरून घेऊन जा. विशेष सवलत* व टपाल खर्च वाचवा.
(* रु. २००च्या नोंदणीवर १०% सवलत)

ज्ञान प्रबोधिनीची संग्राह्य पुस्तके
समृद्ध आशय, तज्ज्ञ लेखक, आकर्षक छपाई, माफक किंमत !

कुमारांसाठी उपयु त पुस्तके

✻ कथासंग्रह
- मृद्गंध ६०/-
- बहर ५०/-
- मोहोर ६०/-
- कहाणी दोन भावांची ३०/-
- मृदुभाव जागे होता... ३०/-
- प्रेरक कथा ४०/-

✻ ललित लेखसंग्रह
- अलगुज ५०/-
- केवड्याचं पान ५०/-
- बकुळफुलं ६०/-

✻ काव्य रसग्रहण लेखसंग्रह
- गंध मोहवी काव्याचा - भाग १ व भाग २ प्रत्येकी ७०/-

✻ कविता/काव्यपं ती संग्रह
- अक्षरबोली, कवितेच्या गावा(प्रत्येकी) ३०/-
- शब्दांची रत्ने ६०/-

✻ विचार व कृतिप्रवर्तक लेखसंग्रह
- स्वीकारशील स्वदेशी ५०/-
- हट्टी व्हा, हट्टी ! ५०/-
- हरित संदेश १५/-

✻ व्य तिविकासाशी निगडित पुस्तके
- प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास ५०/-
- व्य तिविकासासाठी विद्याव्रत ७०/-
- कल्पक बनू या ८०/-
- गीता-गीताई १०/-
- तरंग मनाचे ५०/-

✻ अनुभवपर, प्रेरणादायी पुस्तके
- जिद्दीची लोभस रूपं ६०/-
- आयुष्यातील वादळलाटा ७०/-
- कथा इस्रोची ६०/-
- आम्ही असे घडलो ८०/-

✻ कृतिपर/अभ्यासपर पुस्तके
- त्रिमितीची किमया ८०/-
- असे घटते सुंदर अक्षर १५/-
- प्रज्ञाबोध भाग ४ ६०/- } (NTS साठी उपयु त)
- प्रज्ञाबोध भाग ५ ७०/-

✻ संदर्भ साहित्य
- छात्र प्रबोधन डिव्हिडी भाग २ १५०/-

✻ माहितीपर पुस्तके
- छंद आकाशदर्शनाचा ८०/-
- आपला पाऊस ३०/-

✻ OUR ENGLISH EDITIONS
- Enhancement of Intelligence through play-1&2 (each) 150/-
- Glory of Intelligence 30/-
- Be Creative 150/-
- Green Messages 20/-
- 3 D Magic 80/-

ज्ञान प्रबोधिनीची चरित्रात्मक पुस्तके
- हरिसिंह नलुआ ६०/-
- राष्ट्रद्रष्टे विवेकानंद १२०/-
- विवेकानंद-कन्या भगिनी निवेदिता ८०/-
- ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक वि. वि. पेंडसे १००/-

पालक-शिक्षकांसाठी उपयु त पुस्तके
- आश्वासक पालकत्व ८०/-
- सामाजिक जाणीव संवर्धन ८०/-
- रूप पालटू शिक्षणाचे ३०/-
- बुद्धिवैभव २५/-
- प्रबोधन गीते भाग १ २५/-
- प्रबोधन गीते ऑडिओ सीडी ५०/-
- गंमत मोठ्ठं होण्यातली १५०/-
- हसत खेळत बुद्धिविकास-१ १५०/-
- हसत खेळत बुद्धिविकास-२ १५०/-
- मनुष्य घडणीसाठी आवाहन खंड१ १३०/-
- मनुष्य घडणीसाठी आवाहन खंड२ १२०/-
- राष्ट्रघडणीसाठी मनुष्यघडण १००/-

ज्ञान प्रबोधिनीची वैचारिक पुस्तके
- विवेकानंदांचा राष्ट्रधर्म ६०/-
- समर्थ रामदास काय म्हणाले? ६०/-
- राष्ट्रदेवो भव ५०/-
- स्मृतितुनि स्फुरो कृती १५/-
- महात्मा गांधींचा राष्ट्रधर्म ३०/-
- महर्षी दयानंद काय म्हणाले? ३०/-
- स्वत:ला घडविण्यासाठी उपासना ३०/-

✻ ज्ञान प्रबोधिनी खंड - ४
- भाग १-शिक्षण प्रभाग १००/-
- भाग २-संशोधन प्रभाग १००/-
- भाग ३-ग्रामविकसन प्रभाग १००/-
- चित्ररूप ज्ञान प्रबोधिनी ७५/-

सौर श्रावण, शके १९३६/ऑगस्ट २०१४ पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
प्रकाशन दिनांक : सौर १० श्रावण, शके १९३६ /१ ऑगस्ट २०१४
पंजीकरण क्रमांक (RNI NO.)MAHMAR/2000/5636 **घोषणापत्र क्रमांक :** (PHM/SR/201/VIII/2001)
टपालाने सवलतीच्या दरात पाठविण्याचा परवाना क्रमांक : PCW/050 / 2012 - 2014,
तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्रमांक : WPP- 21.Published & Posted at S.P. Post Office On 1st of Every Month

सळसळणारी सोनपाकळी...

हा फुलांचा फोटो मी पाबे घाटात काढला आहे. ह्या फोटोमध्ये असलेला रंगांचा विरोधाभास मला आवडतो. गर्द हिरव्या रंगावर पिवळ्या रंगाची फुले किती मस्त दिसतात, ते या फोटोकडे पाहिल्यावर कळते.

– योगेश बोकिल, yogeshbokil@gmail.com

पत्त्यामध्ये चुका असल्यास अथवा पिन कोड क्रमांक नसल्यास कळवा.

सौर दिनदर्शिका
शके १९३६

	ऑगस्ट २०१४	श्रावण भाद्रपद
शु.	1	१०
श.	2	११
र.	3	१२
सो.	4	१३
मं.	5	१४
बु.	6	१५
गु.	7	१६
शु.	8	१७
श.	9	१८
र.	10	१९
सो.	11	२०
मं.	12	२१
बु.	13	२२
गु	14	२३
शु.	15	२४
श.	16	२५
र.	17	२६
सो.	18	२७
मं.	19	२८
बु..	20	२९
गु.	21	३०
शु.	22	३१
श.	23	भा. १
र.	24	२
सो.	25	३
मं.	26	४
बु.	27	५
गु.	28	६
शु.	29	७
श.	30	८
र.	31	९

संपर्क पत्ता :
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०)२४२०७ १७४/१७९
www.chhatraprabodhan.org
ई-मेल : chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

या अंकाची किंमत : ₹ १५/-
वार्षिक वर्गणी : ₹ १८०/-

प्रिय पोस्टमन,

हा अंक तुम्ही आमच्या लाड या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना !

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (→) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा-संपादक, छात्र प्रबोधन.

प्रति -